# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२४**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**केज (जि.बीड) येथील ३३ केव्ही उपकेंद्रा मध्ये १० एमव्हीचा ट्रान्सफार्मर उपलब्ध करून देण्याबाबत**

**(१) ५४२९९ (१३-०४-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज, (जि.बीड) येथील ३३ केव्ही उपकेंद्रामध्ये एक १० एमव्हीचा व एक ५ एमव्हीचा ट्रान्सफार्मर असून त्यातील १० एमव्हीचा ट्रान्सफार्मर मागील वर्षभरापासून सतत नादुरुस्त होत असल्याने केज शहरातील व ग्रामीण भागातील छोट्यामोठ्या उद्योगधंद्यासह शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होत आहे. तसेच सदर उपकेंद्र ओव्हर लोड असल्यामुळे ०५ एमव्हीचा ठिकाणी आणखी एक १० एमव्हीचा ट्रान्सफार्मर उपलब्ध करून देणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उर्जा मंत्री यांच्याकडे दिनांक १७ ऑक्टोबर,२०२२ व दिनांक २६ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नादुरुस्त असलेला ट्रान्सफार्मर हा हमी कालवधीत असल्यामुळे ज्यांनी ट्रान्सफार्मर दिला ते कंत्राटदार व ज्यांच्याकडून घेतला ती कंपनी जाणूनबुजुन त्रास देत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ट्रान्सफार्मर दुरूस्त होऊन येण्यास विलंब लागणार असल्याने त्याठिकाणी पर्यायी व्यवस्था म्हणून दुसरा १० एमव्हीचा ट्रान्सफार्मर उपलब्ध करून देण्याबाबत तसेच विजे अभावी मागील चार महिन्यापासून खरीप पिकांचे झालेल्या नुकसानीची शेतकऱ्यांना आर्थिक मदत देणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उर्जा मंत्री यांच्याकडे दिनांक १७ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनांच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०३-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

३३/११ के.व्ही. केज, जि. बीड येथील १० एम.व्ही.ए. चे रोहित्र दि. २७.०६.२०२२ रोजी नादुरुस्त झाले होते. सदर नादुरुस्त रोहित्र दि. १२.१०.२०२२ रोजी दुरुस्त करुन ३३/११ के.व्ही. केज उपकेंद्रामध्ये बसविले. परंतु पुन्हा ते दि. १४.१०.२०२२ रोजी नादुरुस्त झाले. त्या काळात ५ एम.व्ही.ए. च्या एका अतिरिक्त रोहित्राव्दारे व बाजूच्या उपकेंद्राव्दारे सदरील भागातील वीज ग्राहकांना विद्युत पुरवठा सुरळीत करण्यात आला होता. तद्नंतर दि. १८.११.२०२२ रोजी १० एम.व्ही. ए. चे रोहित्र दुरुस्त करुन विद्युत पुरवठा सुरळीत करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

सदर ट्रान्सफॉर्मर हा भोपाळ येथील टेस्ला या कंपनीव्दारे तयार केला होता व आय.पी.डी.एस. या योजनेअंतर्गत मे. राजदिप बिल्डकॉन, अहमदनगर या ठेकेदाराने बसविला होता. सदर ट्रान्सफॉर्मर सलग दोन वेळा नादुरुस्त झाला होता. एकूण नादुरुस्त कालावधी ४ महिने २० दिवस होता. ठेकेदाराने १० एम.व्ही.ए. रोहित्राची दुरुस्ती व बदली केली असल्यामुळे कराराच्या निविदा व सर्वसाधारण अटीनुसार जेवढे दिवस नादुरुस्त रोहित्र बदलण्यास वेळ लागला तेवढे दिवस हमी कालावधी वाढवला आहे.

(३) हे खरे आहे.
(४) सदर रोहित्र नादुरुस्त कालावधीमध्ये संबंधित परिसरातील ३३/११ के.व्ही. कानडीमाळी व कुंबेफळ उपकेंद्रावर भार स्थलांतरीत करुन चक्राकार पध्दतीने शेती करीता वीज पुरवठा करण्यात आला. भविष्यातील विजेची मागणी लक्षात घेऊन सुधारीत वितरण क्षेत्र योजना (RDSS) अंतर्गत कासारी येथे नवीन ३३/११ के.व्ही. उपकेंद्र प्रस्तावित केले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अर्जुना नदी खोरे समृध्दी (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) अभियानांतर्गत वाहणाऱ्या अर्जुना नदीच्या काठावरील गावांचा सर्वांगीण विकास आराखडयाबाबत

**(२) ५८४७० (२७-०४-२०२३). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अर्जुना नदी खोरे समृध्दी अभियानांतर्गत राजापूर तालुक्यातून वाहणाऱ्या अर्जुना नदीच्या काठावरील २८ गावांचा सर्वांगीण विकास करण्याच्या अनुषंगाने जवळपास १ कोटी १० लाख रुपयांचा आराखडा प्रशासनाने गेल्या काही वर्षापूर्वी तयार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आराखड्यामध्ये जलसंधारणासह रस्ते, पर्यटन, कृषी विभागाशी संबंधित विविध कामांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त गावाच्या विकासाच्या दृष्टीने महत्वाच्या ठरणाऱ्या सदर आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी अद्यापही निधीची तरतूद करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तदनुसार उक्त आराखड्यास मंजुरी देऊन तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१२-०३-२०२४) :** (१) व (२) रत्नागिरी जिल्ह्यातील अर्जुना नदीच्या पुनर्जीवन कार्यक्रमास दिनांक १०/०८/२०१७ च्या शासन निर्णयान्वये, तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. त्याअंतर्गत अध्यक्ष, जलयुक्त शिवार अभियान जिल्हास्तरीय समिती तथा जिल्हाधिकारी रत्नागिरी यांच्या दिनांक १६/११/२०१८ रोजीच्या पत्रान्वये, अर्जुना नदीवर ५ कोल्हापुरी पध्दतीचे बंधारे बांधणेच्या कामास प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली. सद्यस्थितीत ५ पैकी ४ कोल्हापुरी बंधाऱ्यांची कामे प्रगतीपथावर असून एका बंधाऱ्याचे काम सुरु न झाल्याने दिनांक ३१.०३.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये, सदर बंधाऱ्याचे काम रद्द करण्यात आले आहे.
(३) व (४) उपरोक्त ४ कोल्हापुरी बंधाऱ्यांच्या रु. २५२.९७ लक्ष इतक्या रकमेच्या कामांसाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून त्यापैकी रु. १७२.४१ लक्ष ची कामे पूर्ण झालेली आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्याकडून दिनांक १८/०१/२०२२ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने दिनांक ३१ मार्च, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कासारी (ता. केज, जि.बीड) येथे नवीन ३३/११ केव्ही उपकेंद्र मंजूर करण्याबाबत

**(३) ५८८८४ (१४-०६-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केज (जि. बीड) येथील ३३ केव्ही उपकेंद्र, मधील १० एमव्हीचा ट्रान्सफार्मर मागील एक वर्षापासून सतत नादुरुस्त होत असल्याने केज शहरातील व ग्रामीण भागातील छोट्यामोठ्या उद्योगधंद्यासह शेतकऱ्यांच्या खरीप व आत्ता रब्बी

पिकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले असल्याने सदर उपकेंद्रावरील भार कमी करण्यासाठी व त्या परिसरातील नागरिकांना अखंड योग्य दाबाने वीज पुरवठा करण्यासाठी कासारी, (ता. केज, जि.बीड) येथे नवीन ३३/११ केव्ही उपकेंद्र मंजूर करणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उर्जा मंत्री यांचेकडे दिनांक ९ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.
३३/११ के.व्ही. केज, जि.बीड येथील १० एम.व्ही.ए. चे रोहित्र दि. २७.०६.२०२२ रोजी नादुरुस्त झाले होते. सदर नादुरुस्त रोहित्र दि. १२.१०.२०२२ रोजी दुरुस्त करुन ३३/११ के.व्ही. केज उपकेंद्रामध्ये बसविले. परंतु पुन्हा ते दि. १४.१०.२०२२ रोजी नादुरुस्त झाले. त्या काळात ५ एम.व्ही. ए. च्या एका अतिरिक्त रोहित्राव्दारे व बाजुच्या उपकेंद्राव्दारे सदरील भागातील वीज ग्राहकांना विद्युत पुरवठा सुरळीत करण्यात आला होता. तद्नंतर दि. १८.११.२०२२ रोजी १० एम.व्ही.ए. चे रोहित्र दुरुस्त करुन विद्युत पुरवठा सुरळीत करण्यात आला आहे.
(२) सदर ३३/११ के.व्ही. केज उपकेंद्राची क्षमता, ११ के.व्ही.ए. वाहिन्यांवरील भार व भविष्यातील विजेची मागणी विचारात घेवून सुधारीत वितरण क्षेत्र योजना (RDSS) अंतर्गत कासारी येथे नवीन ३३/११ के.व्ही. उपकेंद्र प्रस्तावित करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वीट उत्पादकांकडून जीएसटी वाढ कमी करण्यास होत असलेल्या मागणीबाबत

**(४) ६१२८७ (०२-०५-२०२३). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वीट उत्पादकांकडून १२ टक्के जीएसटी वसूल करीत असून उत्पादकांसह घर बांधकाम करणा-या सर्वसामान्यांचे बजेट वाढत असल्याने सदर जीएसटी वाढ कमी करण्याची मागणी अखिल महाराष्ट्र कुंभार विकास संस्थेने माहे जानेवारी, २०२३ वा त्यासुमारास राज्य शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषगांने शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्यांचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अजित पवार (२५-०४-२०२४) :**(१) या कार्यालयाकडे सदर माहिती प्राप्त नाही.
(२) तथापि, शासनाने जीएसटी परिषदेच्या शिफारशीनुसार विट उत्पादकांसाठी आपसमेळ योजना दि. १ एप्रिल २०२२ पासून लागू केलेली असून, सदर योजनेमध्ये विटांवरील जीएसटी चा दर ६ टक्के एवढा आहे.
(३) लागू नाही.

---

### राज्यातील शेतकरी कृषी पंप जोडणीच्या प्रतीक्षेत असल्याबाबत

**(५) ६४५९३ (२८-०८-२०२३). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.शंकरराव गडाख (नेवासा), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), डॉ.राजेंद्र शिंगणे (सिंदखेड राजा), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १ लाख सहा हजार ३४० शेतकऱ्यांनी पैसे भरूनही (मार्च २०२३ अखेर) विजपंपास विज जोडणी देण्याची आजतागायत कार्यवाही करण्यात आली नसल्याचे दिनांक २८ मे, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच वीज पंपास विज जोडणी देण्याचे मराठवाडा व विदर्भातील ८० हजार शेतकऱ्यांना समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आतापर्यंत किती शेतकऱ्यांना कृषी पंप विज जोडणी देण्यात आलेली आहे व ज्या शेतकऱ्यांना कृषीपंप विज जोडणी देण्यात आली नाही त्यांची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कृषी वीजपंपास विज जोडणी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०३-२०२४) :** (१) हे खरे नाही.
राज्यात सन २०२३-२४ मध्ये मे-२०२३ पर्यंत १३,६४९ कृषीपंपांना व मे-२०२३ ते ऑक्टोबर-२०२३ पर्यंत ३९,७९५ कृषीपंपांना अशा एकूण ५३,४४४ कृषीपंपांना वीज जोडण्या देण्यात आलेल्या आहेत.
(२) हे खरे आहे.
राज्यात मार्च २०२३ अखेर पैसे भरुन प्रलंबित असलेल्या १,०६,३४० कृषीपंपांपैकी विदर्भातील ३८,२८४ व मराठवाडयातील ४४,३११ अशा एकूण ८२,५९५ कृषीपंपांचा समावेश आहे.
(३) सन २०२३-२४ मध्ये ऑक्टोबर-२०२३ पर्यंत विदर्भातील १६,१७० व मराठवाडयातील १०,७९९ अश्या एकूण २६,९६९ कृषीपंपाना वीज जोडण्या देण्यात आल्या. कृषी आकस्मिता निधी उपलब्ध नसल्यामुळे पैसे भरुन प्रलंबित कृषी पंपाना वीज पुरवठयाची कामे करण्यासाठी महावितरणच्या अंतर्गत स्त्रोतातून रु. ७०२.७१ कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून सदर कामे प्रगतीपथावर आहेत.
(४) कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२० अंतर्गत पैसे भरुन प्रलंबित असलेल्या कृषीपंपांना वीज जोडणी देण्याकरीता महावितरणच्या अंतर्गत स्त्रोतामधून रु. ७०२.७१ कोटी निधी उपलब्ध करण्यात आला आहे व सदर कामे प्रगती पथावर आहेत. तसेच २०१-६०० मीटर अंतर असलेल्या कृषीपंपांना उच्चदाब वितरण प्रणालीवर वीज जोडणी देण्याकरीता शासनाकडून प्राप्त रु. १०४९.४१ कोटी निधीमधून एकूण २७, २३२ कृषी पंपाना वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत व उर्वरित पैसे भरुन प्रलंबित असलेल्या ५८, ४८२ कृषीपंप ग्राहकांना वीज जोडणी देण्याचे कामे प्रगती पथावर आहे. ३१ मार्च २०२३ अखेर पैसे भरुन प्रलंबित असलेल्या १०६३४० कृषी पंपाना ३१ मार्च २०२४ पर्यंत वीज जोडणी देण्याचे उद्दिष्ट निर्धारित केले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खांडस (ता.कर्जत, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीत उभारण्यात आलेल्या विजेच्या खांबावर विजेच्या तारा बसविण्याबाबत

**(६) ६५२५२ (२७-०९-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खांडस (ता.कर्जत, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीत उभारण्यात आलेल्या विजेच्या खांबावर अद्यापपर्यंत विज पुरवठा करणा-या विजेच्या तारा बसविण्यात आल्या नसल्यामुळे विजे अभावी ग्रामस्थांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ग्रामपंचायत हद्दीत सन २०२० मध्ये २८ विजेच्या खांबांपैकी काही खांब उभे करण्यात आले असून काही विजेचे खांबे रस्त्यावर पडून राहिल्यामुळे अनेक विजेच्या खांबांची दुरावस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित विभागाच्या अधिका-यांच्या दुर्लक्षामुळे उक्त ग्रामपंचायत हद्दीत वेळीच विजेचे खांब बसवून विजेच्या तारा न बसविल्यामुळे विदयुत पुरवठा सुरू होऊ शकला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून खांडस ग्रामपंचायत हद्दीत विज पुरवठा होण्यासाठी विलंब करणाऱ्या व दुर्लक्ष करणा-या संबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई केली तसेच विजेच्या तारा बसविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०३-२०२४) :** (१) हे खरे नाही.

खांडस (ता.कर्जत, जि.रायगड) हद्दीत उभारण्यात आलेल्या लघुदाब विजेच्या खांबावर वीज पुरवठा करणा-या विजेच्या तारा माहे मे,२०२३ मध्ये बसविण्यात आलेल्या आहेत. दरम्यानच्या काळात ग्रामपंचायतीतील ग्राहकांचा वीज पुरवठा अस्तित्वात असलेल्या पायाभूत यंत्रणेमध्ये सुस्थितीत सुरु होता. तसेच वीजेचा अभाव नव्हता.
(२) खांडस (ता.कर्जत, जि.रायगड) या ग्रामपंचायत हद्दीतील ग्राहकांना अधिक दर्जेदार वीज पुरवठा करण्याच्या दृष्टीने पं. दीनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेअंतर्गत १८ वीजेचे खांब बसविणे अंतर्भूत होते. सदर कामाचे कार्यादेश मे.गुप्ता पॉवर या कंपनीस देण्यात आले होते. सदर कंत्राटदाराने तारा न खेचता १८ पैकी १४ लघुदाब खांब उभे केले होते तर ४ खांब उभे केलेले नव्हते.
(३) व (४) बाबत, मे.गुप्ता पॉवर या कंत्राटदारास सदर काम पुर्ण करण्याबाबत महावितरणमार्फत वारंवार निर्देश देण्यात आले होते. परंतू, कामाचा कालावधी पुर्ण झाल्याने ठेकेदाराने काम पुर्ण केलेले नव्हते. त्यामुळे अर्धवट केलेल्या कामाचे कोणतेही देयक सदर कंत्राटदारास अदा करण्यात आलेले नाही.

खांडस गावातील ग्राहकांना दर्जेदार वीज पुरवठा व भविष्यात येणा-या ग्राहकांची वीज मागणी विचारात घेता, उर्वरीत ४ लघुदाब खांब उभे करणे व १८ लघुदाब खांबावर वीजतारा खेचण्याचे काम महावितरण कंपनीच्या सुचिबद्ध कंत्राटदाराकडून सर्व देखभाल व दुरुस्ती अंतर्गत माहे मे-२०२३ मध्ये पुर्ण करण्यात आले आहे. सदर काम पुर्ण करतांना यापुर्वी पं. दीनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेमध्ये लघुदाब वीजेचे खांब सुस्थितीत असल्याने त्याचा वापर महावितरणमार्फत लाईन उभारणीमध्ये करण्यात आलेला आहे.महावितरणमार्फत अपुर्ण काम पुर्ण करण्यात आले असून, खांडस ग्रामपंचायतीतील हद्दीमध्ये सुरळीतपणे वीज पुरवठा करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातूर शहरात अपुऱ्या उपकेंद्रांमुळे वीज पुरवठा वारंवार खंडीत होत असल्याबाबत

**(७) ६५२५७ (२७-०९-२०२३). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर शहराला अपुऱ्या महावितरण व्यवस्थेत वीजपुरवठा केला जात असल्याने, मागणी अधिक व यंत्रणा कमी असल्याने वारंवार वीज पुरवठा खंडीत होत असल्याने नागरिकांना अनेक अडचणीना सामोरे जावे लागत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वीज उपकेंद्राची संख्या वाढवली नाही तर लातूर शहराला वीजपुरवठा करणे देखील कठीण होईल, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लातुर शहराला अखंडीत वीज पुरवठा होण्याच्या दृष्टीने वीज उपकेंद्राची संख्या वाढवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०३-२०२४) :** (१) हे अंशत : खरे आहे.

माहे मे, २०२३ मध्ये मान्सूनपुर्व विद्युत वाहिनीच्या देखभाल व दुरुस्तीची कामे असल्यामुळे तसेच वादळ वारे व अवकाळी पाऊस या कारणांमुळे काही प्रमाणात वीज पुरवठा खंडीत झालेला होता. परंतु सदरील कामे तातडीने हाती घेऊन वीज पुरवठा पुर्ववत करण्यात आला होता.

(२) हे खरे नाही.

लातूर शहरामध्ये भविष्यात येणाऱ्या वाढीव वीज मागणीकरीता सुधारित वितरण क्षेत्र योजना प्रणाली सक्षमीकरण (RDSS) योजनेर्तगत नवीन तीन ३३/११ के.व्ही. उपकेंद्रांची कामे प्रस्तावित केली आहेत.

(३) लातूर शहरामध्ये नवीन ग्राहकांची वाढ होत असल्याने तसेच ग्राहकांच्या विद्युत मागणीत वाढ होत असल्यामुळे भविष्यात येणाऱ्या वाढीव वीज मागणीकरीता लातूर शहराला अखंडीत वीज पुरवठा होण्याच्या दृष्टीने सुधारित वितरण क्षेत्र योजना प्रणाली सक्षमीकरण (RDSS) योजनेअंतर्गत नवीन तीन ३३/११ के.व्ही. उपकेंद्रांची कामे प्रस्तावित केली आहेत. योजनेच्या या घटकास केंद्र शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही प्राधान्याने करण्यात येईल. या व्यतिरिक्त कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२० योजनेच्या कृषी आकस्मिकता निधी (ACF) अंतर्गत ३३/११ के.व्ही. चिंचोलीराववाडी उपकेंद्राची कामे प्रस्तावित केली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## माहूर (ता, जि. नांदेड) येथे अखंडीत वीजपुरवठा करण्याबाबत

**(८) ६५३३२ (२८-०८-२०२३). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहूर (ता, जि. नांदेड) येथे व आसपासच्या परिसरात दिवसा व रात्रीही वीज पुरवठा खंडीत होण्याचे प्रकार वाढले असुन यामुळे नागरिक त्रस्त झाले असून सदरहू प्रकार लोडशेडिंगचा नसून ट्रान्सफॉर्मरच्या क्षमतेहून अधिक मागणीमुळे वीज पुरवठा कमी जास्त प्रमाणात होत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने माहुरवासियांची खंडित वीज पुरवठयामुळे होणारी गैरसोय दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०२४) :**

(१) माहे मे-२०२३ या महिन्यामध्ये अवकाळी पाऊस आणि वादळी वारे यामुळे माहूर शहराला वीज पुरवठा करणाऱ्या ३३ के.व्ही. च्या मुख्य वीज वाहिनीमध्ये बिघाड झाल्यामुळे १३२ के.व्ही. गुंज उपकेंद्रातून येणारी ३३ के. व्ही. वीज वाहिनी ३ ते ४ वेळेस बंद होऊन वीज पुरवठा खंडित झाला होता.

(२) नैसर्गिक आपत्ती जसे की, वादळ वारा, पाऊस यामुळे वीज पुरवठा खंडित झाल्यास महावितरणचे कर्मचारी तसेच सूचिबध्द कंत्राटादारामार्फत कमीत कमी वेळेत वीज पुरवठा सुरळीत करण्यात येतो. तसेच माहूर शहर व परिसरात विद्युत पुरवठा सुरळीत ठेवण्याकरिता नवीन ०४ रोहित्र व ३३ के.व्ही. माहूर उपकेंद्रात ०५ एम.व्ही. ए. क्षमतेचे अतिरिक्त पॉवर ट्रॉन्सफॉर्मर, सुधारीत वितरण क्षेत्र योजना (RDSS) योजनेअंतर्गत प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक जिल्ह्यात महावितरणच्या पायाभूत सुविधांची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(९) ६५३५६ (२७-०९-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात सन २०२१ -२२ मध्ये कृषी आकस्मिक निधी (ACF) मधील मंजूर कामांची निविदा प्रक्रिया काढून ही कामे सुरु करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ९ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास मुख्य अभियंता नाशिक आणि अधीक्षक अभियंता महावितरण मालेगाव यांचेकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विजेच्या सुविधे अभावी येवला औद्योगिक क्षेत्र कार्यान्वित करण्यासाठी अडचण येत असल्याने चिचोंडी (ता.येवला) हे नवीन विदयुत उपकेंद्र आरडीएसएस योजनेतून प्रथम प्राधान्याने हाती घेण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्य अभियंता महावितरण नाशिक यांचेकडे दिनांक २१ एप्रिल, २०२३ तसेच दिनांक १९ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास मागणी केलेली आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कृषी धोरण योजने अंतर्गत असलेल्या नाशिक जिल्ह्यातील तीन पायाभूत सुविधेच्या कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण होवूनही महावितरण मुख्यालयाने निविदा प्रस्तावांना मान्यता न दिल्यामुळे ही कामे सुरु झालेली नसल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २७ मे, २०२३ तसेच दिनांक १६ मार्च, २०२३ रोजी वा त्या सुमारास मा.उपमुख्यमंत्री व मुख्य अभियंता महावितरण नाशिक यांचेकडे तक्रार केलेली आहे,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून नाशिक जिल्ह्यात महावितरणच्या पायाभूत सुविधांची कामे लवकरात लवकर मार्गी लावण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०२४) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

दि. २७ मे, २०२३ रोजीच्या निवेदनात नमूद केल्यानुसार खडक माळेगाव ता. निफाड व मरळगोई ता. निफाड येथील उपकेंद्रात ५ एमव्हीए क्षमतेचे अतिरिक्त ऊर्जा रोहित्र बसविणेकरीता कृषी आकस्मिक निधी अंतर्गत मुख्य कार्यालयाव्दारे मंजूरी देण्यात आली. त्यानुसार, मे. स्वामी सर्व्हिसेस यांना दि. २१.०३.२०२३ रोजी सदर कामाचा कायादेश देण्यात आला. तथापि, सदर ठेकेदाराने काम करण्यास नकार दिल्याने सदर निविदा रद्द करण्यात आली आहे. कृषी आकस्मिकता निधी उपलब्ध नसल्यामुळे महावितरणतर्फे नाशिक जिल्हयाकरीता उपकेंद्राच्या कामांसाठी रु. ६९.२७ कोटी निधी महावितरणच्या अंतर्गत स्त्रोतातून उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सद्यस्थितीत नवीन दरपत्रकानुसार सदर उपकेंद्रातील कामाची निविदा काढण्यात आली आहे व निविदाप्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

तसेच बल्हेगाव ता. येवला, जि. नाशिक येथे ५ एमव्हीए क्षमतेचे नवीन उपकेंद्र उभारण्याकरिता महावितरणच्या अंतर्गत स्त्रोतामधून निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) नाशिक जिल्हयामध्ये कृषीपंप वीज जोडणी धोरण २०२० अंतर्गत १७ नवीन उपकेंद्र उभारणे, ५ उपकेंद्रामध्ये अतिरिक्त ऊर्जा रोहित्र उभारणे व एका उपकेंद्रामध्ये ऊर्जा रोहित्राची क्षमतावाढ करणे अशा एकूण २३ उपकेंद्राच्या कामांना कृषी आकस्मिकता निधीमधून मंजूरी देण्यात आली होती. त्यापैकी ५ उपकेंद्राची कामे प्रगतीपथावर असून उर्वरित १८ उपकेंद्राच्या कामांकरीता कृषी आकस्मिकता निधी उपलब्ध नसल्यामुळे महावितरणच्या अंतर्गत स्त्रोतांमधून नाशिक जिल्हयासाठी रु. ६९.२७ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून सदर निधी अंतर्गत उपकेंद्राच्या कामांबाबत पुढील कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खामगांव (जि.बुलढाणा) येथील शेतकऱ्यांचे कृषी पंपाच्या जोडणीची कामे प्रलंबीत असल्याबाबत**

**(१०) ६५४७० (२८-०८-२०२३). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अमित झनक (रिसोड), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) येथील शेतकऱ्यांच्या कृषी पंपांची कोटेशन भरूनही वीज जोडणी झाली नसल्याची बाब दिनांक १९ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यात कृषी पंपाची वीज जोडणी प्रलंबित असल्याने शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध असूनही सिंचन करून पिके घेता न आल्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रलंबित कृषी पंपाच्या वीज जोडण्या तात्काळ करणे बाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०४-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

महावितरण कंपनीच्या खामगाव विभागात कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२० व इतर विविध योजनेंअतर्गत सन २०२२-२३ मध्ये १८७५ व सन २०२३-२४ मध्ये दि. ११.०९.२०२३ पर्यंत ६४६ अशा एकूण २५२१ कृषीपंप ग्राहकांना वीज जोडण्या देण्यात आल्या असून २६५० कृषीपंप जोडणी पैसे भरुन प्रलंबित आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) कृषीपंप ग्राहकांना कृषी आकस्मिकता निधीच्या उपलब्धतेनुसार व २०१ ते ६०० मीटर अंतरामधील ग्राहकांना शासनाकडून प्राप्त भागभांडवलाच्या माध्यमातून वीज जोडणी देण्यात येत आहेत. त्याअंतर्गत बुलढाणा जिल्हयाकरीता रु. ६५.८९ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला असून खामगाव विभागाकरीता रु. ८.८९ कोटीच्या निविदा महावितरण परिमंडळ स्तरावर व रु.१२.८८ कोटीच्या निविदा महावितरण मंडळ स्तरावर काढून कार्यादेश देण्यात आले असून त्यानुसार कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच ३१-२०० मीटर अंतरामधील दि. ३१.०८.२०२३ रोजी पैसे भरुन प्रलंबित असलेल्या १३२८ कृषी ग्राहकांना वीज जोडणी देण्याकरिता महावितरणच्या अंतर्गत स्त्रोतामधून बुलढाणा जिल्हयाकरिता रु.१३.७५ कोटीचा निधी वितरीत केलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी शहरात वीज वितरणाच्या लोंबकळणाऱ्या तारा, टेलिफोन वायर,**
**इंटरनेट आणि अन्य कामांसाठी वापरण्यात आलेल्या केबलबाबत**

**(११) ६६८५४ (३०-०८-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहरात मागील कांही वर्षापासून वीज वितरणाच्या लोंबकळणाऱ्या तारा, टेलिफोन वायर, इंटरनेट आणि अन्य कामांसाठी भूमिगत केबल याचा त्रास नागरिक, वाहनधारक यांना सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासर्व प्रकाराकडे संबंधित यंत्रणेचे दुर्लक्ष होत असल्यामुळे अनेक वेळा छोटे-मोठे अपघात घडून जिवित हानी होण्याची भिती निर्माण झालेली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने यासर्व प्रकरणी चौकशी व सर्वेक्षण करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०३-२०२४) :**

(१) हे अंशत: खरे आहे.

परभणी शहरातील मागील १० ते २० वर्षापासूनच्या जुन्या लोंबकळणाऱ्या तारांची देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी महावितरणच्या प्रतिबंधात्मक दुरुस्ती तसेच बिघाड दुरुस्ती योजनेअंतर्गत विभागीय स्तरावर निविदा काढून सन २०२२-२३ या वर्षाकरिता उपविभागनिहाय कंत्राटदारांची नेमणूक करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे परभणी शहरात ज्या ज्या ठिकाणी जुन्या लोंबकळणाऱ्या तारा आढळून आल्या त्यांची देखभाल व दुरुस्ती संबंधित उपविभागामार्फत प्रतिबंधात्मक दुरुस्ती तसेच बिघाड दुरुस्ती योजनेअंतर्गत नेमलेल्या ठेकेदारांना विभागीय स्तरावरील कार्यादेश पारित करण्यात येऊन अशा प्रकारच्या लोंबकळणाऱ्या तारांना ताण देऊन तसेच आवश्यक त्या ठिकाणी स्पेसर लावून तात्काळ दुरुस्ती करण्यात येते.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरातील झोपडपट्ट्यांमध्ये अनधिकृतपणे वीज जोडणी करण्यात येत असल्याबाबत

**(१२) ६७०३४ (२९-०८-२०२३). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील बिबवेवाडी परिसरात झोपडपट्ट्यांमधील वीज जोडणीचे जाळे निर्माण झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बऱ्याच झोपडपट्ट्यांमध्ये एकाच ठिकाणावरून अनेक वीज कनेक्शन जोडण्यात आल्यामुळे शॉर्टसर्किट होऊन शॉक बसल्यामुळे नागरिकांचे मृत्यू होत आहेत हे खरे आहे काय,

(३) असल्यास, महर्षीनगर, गुलटेकडी, परिसरात महावितरण कंपनीच्या दुर्लक्षामुळे नागरिकांचे जीवन धोकादायक झाले आहे, हे खरे आहे काय,

(४) तसेच उच्चभ्रू सोसायट्यांमध्ये विजेची जोडणी भूमिगत केलेली आहे त्या धर्तीवर झोपडपट्ट्यांमध्ये भूमिगत विजेची जोडणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०३-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

महावितरणच्या रास्तापेठ शहर मंडळकार्यालयाअंतर्गत झोपडपट्ट्यांमध्ये घरे दाटी वाटीने असल्याने व भुमिगत वाहिनी टाकण्यासाठी जागा नसल्यामुळे अशा काही ठराविक ठिकाणी एकाच पोलवरुन सर्व्हिस वायरनी घरापर्यंत वीज जोडण्या दिलेल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

महावितरणमार्फत अशा प्रकारच्या सर्व ठिकाणी विद्युत सुरक्षेच्या सर्व नियमाचे पालन करुन वीज कनेक्शन देण्यात येतात. तसेच झोपडपट्ट्यांमध्ये वीज जोडणीत शॉर्ट सर्किट होऊन कोणताही अपघात होऊन जीवित हानी झालेली नाही.

(३) हे खरे नाही.

रास्तापेठ शहर मंडळाकार्यालयातील पर्वती पद्ममावती विभागाअंतर्गत महर्षीनगर व गुलटेकडी हा परिसर येत असून महावितरणमार्फत तेथील ग्राहकांच्या सुरक्षितेसाठी विद्युत वाहिन्यांची वेळोवेळी देखभाल व दुरुस्ती करण्यात येते.

(४) रास्तापेठ शहर मंडळ कार्यालयाअंतर्गत सुरक्षिततेच्या दृष्टीने तसेच त्या परिसरातील जागेच्या भौगोलिक परिस्थितीचा विचार करुन भुमिगत वीज वाहिन्यांचे काम करण्यात येते. तसेच झोपडपट्टी परिसरात लघुदाब तारांऐवजी एरियल बंच केबल टाकण्यात आली आहे. परिसरात विविध योजनेअंतर्गत एकूण २.७८ कि.मी. एरियल बंच केबल टाकण्यात आली आहे. तसेच सद्यस्थितीत सुधारित वितरण क्षेत्र योजना प्रणाली सक्षमीकरण (RDSS) योजनेअंतर्गत झोपडपट्टी परिसरात एरियल बंच केबल टाकणे-९.३८ कि.मी. अंदाजे रक्कम रु. २ कोटी, लघुदाब उपरी वीज वाहिनी भूमिगत करणे- १.५ कि.मी. अंदाजे रक्कम रु. ०.२ कोटी व एसएमसी मल्टिमीटर बॉक्सेस बसविणे २००० नग अंदाजे रक्कम रु. ३ कोटी ही कामे प्रस्तावित केलेली आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्हयातील मुख्य वीज वितरण विभागात सामुग्री उपलब्ध होत नसल्याबाबत

**(१३) ६७२९५ (३१-०८-२०२३). श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील मुख्य वीज वितरण विभागात आवश्यक असणाऱ्या एल.टी.वायर व पोल, एच.टी.वायर व पोल ई. अनेक सामुग्रीची कमतरता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामुग्रीच्या कमतरतेमुळे अखंडित वीज पुरवठा करण्यास अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय.

(३) असल्यास, सामुग्री उपलब्ध करून पुर्ण दाबाने व सुरळीत वीज पुरवठा करून नागरीकांना दिलासा देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०३-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.

रायगड जिल्हयासाठी १२ कि.मी. एल.टी. वायर, ८.१ किमी एच. टी. वायर, ३५२ (नग) एल.टी पोल व २३२ (नग) एच.टी पोल इतकी सामुग्री मध्यवर्ती भांडार कक्षात उपलब्ध आहे. नवीन वीज पुरवठा तसेच अस्तित्वात असलेल्या वीज यंत्रणेच्या देखभालीसाठी महावितरणव्दारे विविध साधनसामुग्रीची खरेदी वेळोवेळी करण्यात येते. वीज वितरण व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी सुचीबध्द कंत्राटदारांमार्फत दुरुस्तीची कामे करण्यात येत असून सामुग्री अभावी वीज पुरवठा खंडीत होणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे.

(३) रायगड जिल्हयाअंतर्गत सन २०२२-२३ मध्ये जिल्हा नियोजन समिती अंतर्गत रु. ४.३१ कोटी व वार्षिक देखभाल दुरुस्ती योजनेअंतर्गत रु. १३.३३ कोटीची कामे करण्यात आली आहेत. तसेच वीज वितरणक्षेत्र सुधारणा योजने (RDSS) अंतर्गत रु. १.३२१ कोटी इतक्या रकमेची वीज वितरण व्यवस्था सुधारण्यासाठीची कामे प्रस्तावित असून सदर योजनेचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महावितरणाच्या नियमांची जनजागृती ग्राहकांपर्यंत पोहचत नसल्याबाबत

**(१४) ६७७१२ (२७-०९-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नियामक आयोगाने महावितरणाला प्रत्येक कामासाठी वेळेची मर्यादा घातली असून वेळेत लाईट आली नसल्यास किंवा उपकरण जळाले तर काही प्रमाणात ग्राहाकांना महावितरणकडून नुकसान भरपाई दिली जाते, परंतु अमरावती जिल्हयात अशाप्रकारच्या कोणत्याही तक्रारी ग्राहकांकडून आल्या नसल्याने कोणालाच नुकसान भरपाई मिळाली नसल्याचे महावितरणे सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी नियामक आयोगाने महावितरणला प्रत्येक कामासाठी दिलेल्या वेळे मर्यादेसंदर्भात काय नियम आहेत, याची माहिती ग्राहकांना दिली नसल्याचे तसेच या नियमांसदर्भात महावितरणकडूनही जनजागृतीही केली नसल्याचे दिनांक ६ एप्रिल,२०२३ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी महावितरणकडून जनजागृती करुन तक्रार करणाऱ्या ग्राहकांना भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०३-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) ग्राहकांच्या माहितीसाठी महाराष्ट्र वीज नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके व पॉवर क्वॉलीटी) विनियम २०२१ महावितरणच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. तसेच महावितरणच्या उपविभागीय, विभागीय तसेच मंडळ कार्यालयाच्या दर्शनी भागात कृती-मानके साध्य करण्यास अपयश आल्यास ग्राहकाला द्यावयाची नुकसान भरपाई दर्शविणारे मुद्येनिहाय फलक लावण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केज (जि. बीड) मतदार संघातील अंबाजोगाई तालुक्यातील RDS योजनेत मंजूर नवीन ३३ केव्ही उपकेंद्रांची कामे सुरु करण्याबाबत

**(१५) ६७७९२ (२९-०८-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केज (जि. बीड) मतदार संघातील अंबाजोगाई तालुक्यातील एकूण ०६ नवीन ३३ केव्ही उपकेंद्र RDS योजनेत मंजूर असून सदर नवीन ३३ केव्ही उपकेंद्राची निविदा प्रक्रिया करून कामे सुरु करणे बाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उर्जा मंत्री यांचेकडे दिनांक २२ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारस निवेदनाद्वारे केली होती. हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने ०६ पैकी किती नवीन ३३ केव्ही उपकेंद्राचे टेंडर प्रक्रिया करून कामे सुरु केली वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास , विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) सुधारीत वितरण क्षेत्र योजना (RDSS) या योजनेंत येणाऱ्या विद्युत पायाभूत सुविधा सक्षमीकरण व आधुनिकीकरण मध्ये सदरची ६ नविन ३३/११ के.व्ही. उपकेंद्रे प्रस्तावित केली आहेत. सदर कामांसाठी महावितरणमार्फत निविदा प्रक्रिया लवकरच राबविण्यात येऊन सदरची कामे हाती घेण्यात येणार आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंबाजोगाई (जि. बीड) शहरासाठी महावितरणचा सध्याचा उपविभाग ठेऊन ग्रामीण भागासाठी नवीन उपविभागाला मंजुरी देण्याबाबत

**(१६) ६७९२३ (२६-०९-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजोगाई (जि. बीड) तालुक्यात मोठ्या प्रमाणात नागरिक उद्योग धंदे, शिक्षणासाठी शहरात स्थलांतरीत झाले असून शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत असून देखील शहरात महावितरणचे एक उप विभागीय कार्यालय असल्याने सदर कार्यालयावर शहरासह ग्रामीण भागाचाही विदयुत भार येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंबाजोगाई शहरासाठी सध्याचा उपविभाग ठेऊन ग्रामीण भागासाठी नवीन उपविभागाला मंजुरी देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उर्जा मंत्री यांचेकडे दिनांक १ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारस निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०४-२०२४) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) महावितरण कंपनीच्या अंबाजोगाई उपविभागाची सद्यस्थितीत वीज ग्राहक संख्या ६८,२३० इतकी आहे.

महावितरण कंपनीच्या दि.०४.११.२०१० रोजीच्या आदेशानुसार उपविभागीय कार्यालय विभाजनाकरिता ६०,००० इतकी वीज ग्राहक संख्या असणे आवश्यक आहे व नवीन उप विभागीय कार्यालय निर्मितीकरिता ३०,००० किंवा त्यापेक्षा जास्त वीज ग्राहक संख्या असणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत अंबाजोगाई उपविभाग कार्यालय विभाजनक्षम आहे. याबाबत महावितरण कंपनीच्या विहीत ग्राहक मानंकाप्रमाणे ग्राहक संख्येचा निकष व आर्थिक दायित्वाचा विचार करुन सदर प्रस्तावावर धोरणात्मक निर्णय घेऊन कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे दापोरी (ता.तिवसा, जि.अमरावती) येथील गावात एकाच डीपीवर विज पुरवठा होत असल्याबाबत

**(१७) ६८०४६ (२७-०९-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे दापोरी, खुर्द (ता.तिवसा, जि.अमरावती) येथील गावात एकाच डीपीवर विज पुरवठा सुरु असल्याने विज भार वाढत असल्याने विद्युत भार कमी होऊन विज खंडीत होते असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कारणास्तव अतिरिक्त रोहित्र देण्याबाबत नागरिकांनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने अतिरिक्त रोहित्र उपलब्ध करुन नियमित वीज पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०२४) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) मौजे दापोरी खुर्द या गावात अतिरिक्त १०० के.व्ही.ए. क्षमतेचे रोहित्र उभारण्याच्या कामाचे अंदाजपत्रक दि. १९.०१.२०२३ रोजीच्या पत्रानुसार मंजूर करण्यात आले आहे. सदर कामासाठी जिल्हा नियोजन समितीकडे प्रशासकीय मान्यतेकरीता IPAS प्रणालीमध्ये अपलोड करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तिवसा (जि.अमरावती) तालुक्यातील कापुसतळणी येथील विदयुत पुरवठा पाच ते सहा दिवस बंद असल्याबाबत

**(१८) ६८०४९ (२७-०९-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तिवसा (जि.अमरावती) तालुक्यातील कापुसतळणी येथील विदयुत पुरवठा ७५ कि.मी. अंतरावरुन येत असल्याने या गावातील ५ ते ६ दिवस विदयुत पुरवठा बंद तर असतोच त्याचबरोबर कृषी विदयुत पुरवठाही नियमित होत नसल्याचे माहे मे, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी कापुसतळणी या गांवात डवरगांव येथुन विजपुरवठा व्हावा या बाबत संबंधितांना निवेदन देण्यात आले आहे , हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

कापूसतळणी गावाचा वीज पुरवठा ११ के.व्ही. डवरगाव गावठाण फिडरव्दारे ३३ के.व्ही. माहुली उपकेंद्रामधून सुरु आहे. सदर फिडरव्दारे २६६४ अकृषिक व ६ कृषी ग्राहकांना वीज पुरवठा करण्यात येत आहे. सदर फिडरची लांबी ६५ किमी आहे. माहे एप्रिल-२०२३ मध्ये सदर फिडरवर तांत्रिक दोष निर्माण होऊन वीज पुरवठा खंडीत होण्याच्या २१ घटना घडल्या त्याचा कालावधी एकूण २७ तास ४४ मिनिटे असा आहे. तसेच माहे मे-२०२३ मध्ये सदर फिडरवर तांत्रिक दोष निर्माण होऊन वीज पुरवठा खंडीत होण्याच्या ३१ घटना घडल्या असून त्याचा कालावधी एकूण १५ तास १० मिनिटे असा आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सदर निवेदनाच्या अनुषंगाने ११ के.व्ही. डवरगाव गावठान फिडरची लांबी ६५ किमी असल्यामुळे सदर कापूसतळणी गावाला ११ के.व्ही. MIDC फिडर (गावठाण फिडर) वरुन वीजपुरवठा करण्यासाठीचे अंदाजपत्रक दि. १०.०२.२०२३ नुसार मंजुर करण्यात आले आहे. सदर कामासाठी जिल्हा नियोजन समितीकडून प्रशासकीय मान्यता मिळालेली असून, सदर काम करण्याचे आदेश दि.३१.०३.२०२३ नुसार मे. यश इंजिनिअर्स अँन्ड कॉन्ट्रॅक्टर अमरावती यांना देण्यात आलेले आहेत. सदर काम प्रगतीपथावर आहे. काम पुर्ण झाल्यानंतर कापूसतळणी गावाचा वीज पुरवठा ११ के.व्ही. डवरगाव गावठाण वाहीनी वरुन ११ के.व्ही. एम.आय.डी.सी. वाहीनीवर जोडण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्हयातील तिवसा तालुक्यातील डवरगांव येथील कांही शेतक-यांच्या शेतातील विदयुत पोल वाकलेले असल्याबाबत

**(१९) ६८०५० (२७-०९-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डवरगांव (ता.तिवसा, जि.अमरावती) येथील कांही शेतक-यांच्या शेतातील विदयुत पोल वाकलेला असल्याने त्यांनी सदरहू पोल दुरुस्त करण्याबाबतचे निवेदन दिले असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, उक्त शेतक-यांच्या शेतातील वाकलेल्या विजेच्या पोलच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर गाव व परीसरामध्ये मे २०२३ मध्ये वादळी वारा व पाऊस झाल्यामुळे श्री. किरण पोलादे, श्री. एकनाथ भांडे व इतर यांच्या शेतातील ३७ पोल वाकले होते व ०८ पोल तुटले होते. सदर ठिकाणचे तुटलेले ८ पोल बदलण्याचे व वाकलेल्या ३७ पोलच्या दुरुस्तीचे काम दिनांक २३.१०.२०२३ रोजी पूर्ण झाले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### शिरुर (जि.पुणे) तालुक्यामध्ये वीज ग्राहकांना अखंडीत वीज पुरवठा करण्याबाबत

**(२०) ६८१०२ (२९-०८-२०२३). ॲड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरुर (जि.पुणे) तालुक्यामध्ये इन्फ्रा २ मध्ये नवीन ३३/११ के.व्ही. उपकेंद्र सुरु करण्यात आले असून नवीन उपकेंद्र कमी भारीत आहेत व उपकेंद्र जवळील परिसरात २२ केव्ही उच्च दाब वाहिनी वरुन विदयुत पुरवठा करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर २२ केव्ही उच्च दाब वाहिनीची लांबी जास्त असल्याने अखंडीत विदयुत पुरवठा करण्यास विविध समस्या येत आहेत हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, २२ केव्ही उच्च दाब वाहिनी वरील भार इन्फ्रा २ मध्ये नवीन ३३/११ के.व्ही. निमोणे, आलेगाव पागा उपकेंद्रावर जोडून अखंडीत वीज पुरवठा सुरळीत होणेकरिता २०० रोहित्रांची आवश्यकता असून याबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०४-२०२४) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) १३२/२२ के.व्ही. शिरुर उपकेंद्रातील २२ के. व्ही. मल्लीकार्जुन फिडरची लांबी जास्त असल्यामुळे कृषीपंप वीज जोडणी धोरण २०२० अंतर्गत कृषी आकस्मिकता निधीमधून सदर वाहिनीवरील ५८ रोहित्र ११ के.व्ही. क्षमतेमध्ये रुपांतरीत करुन ३३/११ के.व्ही. निमोणे उपकेंद्रावर स्थलांतरीत करण्यात आले आहेत तसेच नुतनीकरण व देखभाल (R&M) या योजनेअंतर्गत उर्वरित ७५ रोहित्र ११ के.व्ही. क्षमतेमध्ये रुपांतरीत करुन ३३/११ के.व्ही. निमोणे उपकेंद्रावर स्थलांतरीत करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच ३३/२२ के.व्ही. न्हावरा उपकेंद्रातील २२ के.व्ही. आलेगाव फिडरची लांबी जास्त असल्यामुळे सदर फिडरवरील २२ के.व्ही. चे ८० रोहित्र ११ के.व्ही. क्षमतेमध्ये रुपांतरीत करुन आलेगांव उपकेंद्रावर घेण्याचे काम नुतनीकरण व देखभाल (R&M) योजनेअंतर्गत प्रगतीपथावर आहे. त्यानंतर सदरील रोहित्रांना विद्युत पुरवठा करणाऱ्या वाहिनीची लांबी कमी होऊन ग्राहकांना योग्य दाबाने वीज पुरवठा करता येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबईतील वरळी, नायगांव येथील पोलीस कर्मचाऱ्यांच्या या वसाहतीतील निवासस्थानाच्या इमारतींची दुरवस्था झाल्याबाबत

**(२१) ६८१५७ (२९-०८-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वरळी, नायगाव या मोठ्या पोलीस वसाहतीसह शहरात एकूण ४६ पोलीस वसाहतीत हजारो पोलीस कुटुंबिय वास्तव्य करीत असलेल्या काही पोलीस वसाहतींची दुरवस्था झाली असल्याने येथील पोलीस कर्मचाऱ्यांच्या वसाहतीतील निवासस्थानांची अवस्था धोकादायक झाली असून सदरच्या इमारती मोडकळीस आल्यामुळे पडझड होत असल्याबाबत तसेच या निवासस्थानाच्या दुरुस्तीबाबतची मागणी राज्याचे मा. उप मुख्यमंत्री (गृह), मा. मंत्री (सार्वजनिक बांधकाम), मा. पोलीस महासंचालक यांच्याकडे दिनांक १७ एप्रिल, २०२३ वा त्यासुमारास पोलीस कर्मचाऱ्यांनी तसेच `समर्थन' संस्थेने निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी पोलीस कुटुंबियांच्या सुरक्षिततेसाठी सरकारने निधीसाठी व प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०३-२०२४) :** (१) व (२), होय.

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या आस्थापनेवर असलेल्या पोलीस वसाहतीतील इमारतीच्या दुरुस्तीबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पाहणी करण्यात येवून तसेच दुरुस्तीबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त अंदाजपत्रकानुसार पोलीस आयुक्त कार्यालयाच्या तसेच शासन स्तरावर वित्तीय मर्यादेच्या अनुषंगाने प्रशासकीय मान्यता तसेच निधी देण्याबाबत कार्यवाही करण्यात येते. त्याअनुषंगाने, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई कार्यालयाच्या आस्थापनेवर असलेल्या इमारतीची देखभाल व दुरुस्ती करण्यात येते. तसेच शासनाकडून इमारती दुरुस्ती व देखभाली करीता प्राप्त होणारा निधी सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून मागणीपत्र मागविण्यात येवून, त्याप्रमाणे कामाचे स्वरूपानुसार त्या त्या प्रमाणात सार्वजनिक बांधकाम विभागास निधी वाटप करण्यात येतो.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात गावठाण फिडर सेपरेशन व नवीन उपकेंद्र मंजुरीची कामे करण्याबाबत

**(२२) ६८२५३ (२९-०८-२०२३). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात पश्चिम महाराष्ट्राच्या धर्तीवर गावठाण फिडर सेपरेशन ची कामे तसेच नवीन उपकेंद्र मंजुरीची कामे करण्यासाठी महावितरण मंडळ कार्यालय लातूर यांनी सन २०२२ मध्ये RDSS योजनेत समाविष्ट करून मंजुरीसाठी प्रकल्प संचालक, महावितरण कंपनी, प्रकाशगड मुंबई यांच्याकडे सादर केलेले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील कामांना मंजुरी देऊन कामे हाती घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, औसा विधानसभा मतदारसंघातील किती कामांचा मंजूर कामामध्ये समावेश असून सदरील कामे पूर्ण होण्यास किती कालावधी लागेल
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०२४) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) वाहिनी विलगीकरणाच्या (फिडर सेपरेशन) कामांना मंजुरी देण्यात येऊन निविदा प्रक्रिया पुर्ण करुन प्रत्यक्ष कामांना सुरुवात झाली आहे. नवीन उपकेंद्रांच्या कामांना केंद्र शासनाकडून सन २०२३-२४ मध्ये मंजूरी प्राप्त होणे अपेक्षित आहे.
(३) लातुर जिल्हयातील औसा मतदार संघातील ५४ कृषी वाहिन्यांच्या विलगीकरणाच्या कामांचा कार्यादेश देण्यात आला आहे. कामे पूर्ण करण्याचा प्रस्तावित कालावधी एकूण २७ महिन्यांचा आहे. औसा मतदार संघात सुधारित वितरण क्षेत्र योजना (RDSS) योजनेअंतर्गत आशिव, उजनी व हालसी हत्तरगा (रामलींग मुदगड) येथे नवीन ३३/११ के.व्ही. उपकेंद्र नागरसोगा, जवळगा पो खरोसा, तपसेचिंचोली येथे अतिरिक्त ५ एम.व्ही.ए. उच्चदाब रोहीत्र आणि ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, औसा येथे ५ एम.व्ही.ए. ते १० एम.व्ही.ए. उच्चदाब रोहीत्र क्षमतावाढ प्रस्तावीत करण्यात आलेली आहेत. सुधारित वितरण क्षेत्र योजना (RDSS) योजनेअंतर्गत औसा मतदार संघासाठी अंदाजे रु. १६०.९० कोटीचा डी.पी.आर. प्रस्तावीत करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पंढरी मध्यम प्रकल्प ( ता. वरुड जि. अमरावती ) येथील प्रकल्पाच्या उर्वरीत कामाबाबत

**(२३) ६८२७९ (०३-०९-२०२३). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरी मध्यम प्रकल्प (ता. वरुड ,जि. अमरावती) येथील संबधित कंत्राटदारास प्रकल्पाचे उर्वरीत काम माहे जून, २०२३ पर्यंत पुर्ण करण्यासाठी शासनाकडून निर्देश देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाचे काम माहे जून, २०२३ पर्यंत पुर्ण करण्यासाठी कंत्राटदारास संबधित कार्यकारी अभियंता यांचेकडून कालबध्द कार्यक्रम ठरवुन दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रकल्पाचे काम ठरवुन दिलेल्या कालबध्द कार्यक्रमानुसार संबधित कंत्राटदाराने काम पूर्ण केले आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०२४) :** (१) होय खरे आहे,
वर्धा नदीवर पीकअप विअर शीर्ष नियंत्रक व फिडर चॅनलचे बांधकाम व पंढरी धरणाचे मातीकाम, सांडवा, मुख्य विमोचक व इतर संलग्न कामे जून, २०२३ पर्यंत पुर्ण करणेबाबत कंत्राटदारास कार्यकारी अभियंता, अमरावती मध्यम प्रकल्प विभाग, अमरावती यांचे पत्र दि.२३.०१.२०२३ अन्वये कळविण्यात आले आहे.
(२) होय हे खरे आहे,
सदर प्रकल्पाचे काम माहे जुन- २०२३ पर्यंत पुर्ण करण्यासाठी कार्यकारी अभियंता, अमरावती मध्यम प्रकल्प विभाग, अमरावती यांचे पत्र दि.१४.१२.२०२२ नुसार संबंधित कंत्राटदारास कालबध्द कार्यक्रम ठरवुन दिलेला आहे.
(३) कंत्राटदाराची कामाची प्रगती असमाधानकारक व अतिशय संथ असल्याने त्यांना वारंवार सुचित करण्यात आले असून दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धारणी (जि.अमरावती) तालुक्यामधील शेतकऱ्यांना वीज जोडणी नसतांनाही वीज देयके महावितरण कडून येत असल्याबाबत

**(२४) ६८४९२ (०३-०९-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धारणी (जि.अमरावती) तालुक्यामधील शेतकऱ्यांना शेतात इलेक्ट्रीक खांब, एचवायडीएस ट्रान्सफार्मर, एल.एफ. खांब ई. सुविधा उपलब्ध नसतांना, शेतात वीज मिटर जोडणी नसतांना सुध्दा गेल्या ५ वर्षापासुन शेतात विज वापरत असल्याचे दाखवून जादा विज देयके धारणी महावितरण प्रशासनाकडून पाठविण्यात आले असल्याची गंभीर बाब माहे मे २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय
(२) असल्यास, महाराष्ट्र शासन व केंद्र शासनाकडून विविध योजना कार्यन्वित असून याकरीता २०१८ ते २०२० मध्ये ए.जी. पॉलीसी योजनेत धारणी तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी विज मिटर अर्जासह अमानत रक्कम सुध्दा भरली असतांना गेल्या ५ वर्षापासुन शेतकऱ्यांना विज मिटर जोडणी दिली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वंचित शेतकऱ्यांना विज कनेक्शन मिळणेबाबत तसेच विज मिटर जोडणी नसतांना सुध्दा गेल्या ५ वर्षापासुन शेतात विज वापरत असल्याचे दाखवून भरमसाठ विज देयके देणाऱ्या यंत्रणेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०४-२०२४) :** (१) हे खरे आहे.
महावितरण कंपनीमार्फत धारणी (जि. अमरावती) तालुक्यामधील १० शेतकऱ्यांना प्रचलित पध्दतीने वीज जोडणी न देताच वीज देयके देण्याचे आल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) हे खरे नाही.
धारणी तालुक्यामध्ये सन २०१८ ते २०२० मध्ये पैसे भरुन प्रलंबित असलेल्या एकूण २४५ कृषीपंप ग्राहकांपैकी २३१ कृषीपंपांना वीज जोडण्या देण्यात आल्या असून उर्वरित १४ कृषीपंपांचे कार्यादेश देण्यात आले असून सदर

ग्राहकांची कामे प्रगतीपथावर आहेत.
(३) सदर १० ग्राहकापैकी ९ ग्राहकांना कृषीपंप वीज जोडणी देण्यासाठी निधीची मागणी आदिवासी एकात्मिक विकास विभाग, धारणी यांच्याकडे करण्यात आली आहे तसेच एका ग्राहकाचे अंतर ६०० मीटरपेक्षा जास्त असल्याने सोलर कृषीपंप वीज जोडणीसाठी महाऊर्जा (MEDA) कडे वर्ग करण्यात आला आहे. सदर सर्व १० ग्राहकांचे चुकीचे वीज देयके रद्द करण्यात आली आहेत. सदर कृषी ग्राहकांचे चुकीचे मीटर वाचन करणाऱ्या एजन्सीचा कार्यादेश रद्द करण्यात आला असून या संबंधात दोषी अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्ह्यातील विजेच्या रोहित्रावर अतिरिक्त भार आल्याने हजारो वीज रोहित्र जळाली असल्याबाबत**

**(२५) ६८५७४ (३०-०८-२०२३). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्यातील विजेच्या रोहित्रावर अतिरिक्त भार आल्याने मागील वर्षाच्या तुलनेत यावर्षी हजारो वीज रोहित्र जळाले असून यात थ्री फेज आणि सिंगल फेज चा समावेश असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक १ एप्रिल, २०२२ ते दिनांक ३१ मार्च, २०२३ या वर्षभरात जिल्ह्यातील थ्री फेजचे १८३० विज रोहित्र जळाले तर सिंगल फेजचे ५५० रोहित्र जळाले यांची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी जनतेतून होत असतानाही पुरेशा मनुष्यबळ अभावी अनेक गावांना किमान आठ ते दहा दिवस प्रतीक्षा करावी लागत असल्याने शेतकऱ्यांच्या शेती पिकाचे आणि इतर व्यवसायिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे,, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, रोहित्र जळाल्यास ताबडतोब दुसरे रोहित्र बसवण्यासाठी पुरेशा एजन्सी आणि मनुष्यबळ देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०४-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) सन २०२२-२३ मध्ये थ्री फेजचे १८३० व सिंगल फेजचे ५१५ रोहित्रे नादुरुस्त झाली होती. रोहित्र नादुरुस्तीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर तातडीने नादुरुस्त रोहित्र बदलण्यात आली आहेत.
(३) हिंगोली मंडळाअंतर्गत नादुरुस्त रोहित्र दुरुस्त करण्यासाठी ९ रिपेअरींग एजन्सी व नादुरुस्त रोहित्र बदलण्यासाठी ८ रिप्लेसमेन्ट एजन्सी नेमलेल्या आहेत. सद्यस्थितीत हिंगोली गाळणी कक्षात नादुरुस्त रोहित्र बदलण्यासाठी दुरुस्त केलेल्या रोहित्रांचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. तसेच हिंगोली जिल्हयातील वितरण रोहित्रांवरील वीजभार कमी करण्यासाठी व रोहित्र जळाल्यानंतर तातडीने उपलब्ध करुन देण्यासाठी जिल्हा नियोजन व विकास मंडळ (DPDC) व सामान्य विकास पध्दती सुधारणा (NDSI) योजनेअंतर्गत १०० केव्हीए चे २५० नवीन रोहित्रांचे नियोजन केलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मलकापूर (जि.बुलढाणा) शहरांमध्ये वीज वितरण कंपनीच्या फ्युज पेट्यांवर दरवाजे लावण्याबाबत**

**(२६) ६८७७६ (०१-०९-२०२३). श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अमित झनक (रिसोड), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मलकापूर (जि.बुलढाणा) शहरातील वीज वितरण कंपनीच्या विद्युत रोहित जवळ खांबावर असलेल्या फ्युज पेट्यांवर दरवाजे नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर फ्युज पेट्या या उघड्या असल्यामुळे तसेच काही फ्युज पेट्यांची अवस्था अत्यंत दैनिय असल्यामुळे लहान मुले तसेच जनावरे यांचा अपघात घडण्याची शक्यता वाढली आहे , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वेळीच अपघात टाळण्यासाठी विदयुत रोहित्र जवळ खांबावर असलेल फ्युज पेट्यांना लवकरात लवकर दरवाजे लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मलकापूर शहराअंतर्गत विद्युत रोहित्राजवळ खांबावर असलेल्या फ्युज पेटयांवर दरवाजे नसल्याची बातमी दि. १९.०४.२०२३ च्या वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित झाली होती. मलकापूर शहराअंतर्गत एकूण १६९ रोहित्र असुन त्यापैकी १३४ वितरण पेटया तांत्रिक दृष्टया सुस्थितीत आहेत व ३५ रोहित्रांच्या वितरण पेटयांचे दरवाजे नादुरुस्त स्थितीत असल्याचे निदर्शनास आले.
(२) हे खरे नाही.

मलकापूर शहराअंतर्गत फ्युज पेटयांवर दरवाजे नसणाऱ्या वितरण पेटयांच्या ठिकाणी कुठलाही अपघात घडल्याची अद्याप नोंद नाही. तसेच १६९ पैकी नादुरुस्त ३५ फ्युज पेटयांवरील दरवाज्यांच्या दुरुस्तीचे काम युध्दपातळीवर पुर्ण करण्यात आले आहे.
(३) महावितरण कंपनीव्दारे प्रतिबंधात्मक दुरुस्तीअंतर्गत (Preventive Maintenance) कार्यादेश निर्गमित करुन सर्व ३५ नादुरुस्त वितरण पेटयांची दुरुस्ती करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील महावितरण विभागीय कार्यालयाकडून निकृष्ट दर्जाचे काम केल्याबाबत**

**(२७) ६८८७१ (२७-०९-२०२३). श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हयातील भोकर, माहूर, किनवट उमरी आदी तालुक्यात नवीन पोल बसविणे, तारा बसविणे, डीपी बसविणे इत्यादी कामे महावितरण विभागीय कार्यालयाकडून नेमण्यात आलेल्या ठेकेदारांनी कोटयावधी रुपयांच्या निकृष्ट दर्जाचे काम करुन देयके घेतले असल्याचे माहे जून, २०२३ रोजी उघडकीस आल्याचा प्रकार माहे जून, २०२३ च्या पहिल्या आठवडयात समोर आला हे खरे आहे काय ?
(२) असल्यास, सदरील अनिमित झालेल्या कामाची चौकशी करुन संबंधित ठेकेदारावर व महावितरण विभागातील अधिकारी व कर्मचा-यांवर कोणती करवाई केली वा करण्यात येत आहे ,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०४-२०२४) :** (१) हे खरे नाही.

याबाबत कोणत्याही प्रकारच्या तक्रारी विभागीय कार्यालयास जुन, २०२३ पर्यंत आढळून आलेल्या नाहीत.

तथापी, भोकर विभागाअंतर्गत हदगाव उपविभागातील दि. २५.११.२०२२ रोजीच्या दैनिक सकाळ या वृत्तपत्रात “महावितरणच्या गुत्तेदाराकडून देखभालीचे कामे बोगस” या मथळयाखाली बातमी प्रसिध्द झाली होती. तसेच दि. ०२.१२.२०२२ रोजी श्री. अमोल अशोकराव कदम रईकर यांची गावठाण व शेती फिडर/डीपी साठी नेमलेल्या मे. लक्ष्मी इलेक्ट्रिकल एजन्सिल यांच्या बोगस कामाची चौकशी बाबतची लेखी तक्रार उपविभागीय कार्यालय हदगाव येथे प्राप्त झाली होती.
(२) अधिक्षक अभियंता, मंडळ कार्यालय, नांदेड यांनी दि. ३०.११.२०२२ अन्वये हदगाव उपविभागाअंतर्गत देखभाल दुरुस्तीच्या कामाची तपासणी करण्याचे आदेश दिले होते. मे. पुष्कर इलेक्ट्रिकल्स, नांदेड या कंत्राटदाराने त्यास अदा करण्यात आलेल्या बिलामध्ये लघुदाब वाहिनी-१२० स्क्वे.एम.एम. सिंगल कोर केबल ५० मीटर आढळून आले. मे. पुष्कर इलेक्ट्रिकल्स, नांदेड या कंत्राटदाराला निविदा बरखास्तीची कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली होती. तद्नंतर कारणे दाखवा नोटीसीचे उत्तर असमाधानकारक असल्यामुळे मे. पुष्कर इलेक्ट्रिकल्स, नांदेड या कंत्राटदारास दि. २१.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये बरखास्त करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सुरगाणा (जि. नाशिक) तालुक्यातील आदिवासी गांवाना वीज जोडणी देण्याबाबत**

**(२८) ६८९९४ (३१-०८-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुरगाणा (जि. नाशिक) तालुक्यातील ५६ आदिवासी भागातील गावांना अद्यापही वीज पोचलेली नसल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी बहुल ५६ गावांना वीज जोडणी देण्यासाठी एकूण १३३० लक्ष इतका निधी लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सुरगाणा तालुक्यातील गावांना वीज जोडणी देण्याबाबत शासनाने चौकशी करुन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०४-२०२४) :**

(१) व (२) हे अंशत: खरे आहे.

सुरगाणा तालुक्यात एकूण १९१ गावे असून पूर्ण १९१ गावांचे विद्युतीकरण झालेले आहे. वर नमूद ५६ गावे नसून नव्याने स्थापित झालेल्या छोटया वस्त्या आहेत व त्यांचे विद्युतीकरण करणे प्रलंबित आहे. सदर ५६ नव्याने स्थापित झालेल्या छोटया वस्त्यांना वीज जोडणी देण्यासाठी रु.१३३० लक्ष इतका निधी लागणार आहे.

(३) सदर ५६ वस्त्यांना वीज जोडणी देण्यासाठीची अंदाजपत्रके तयार करुन सदर अंदाजपत्रके विभागीय कार्यालय, कळवण व मंडल कार्यालय, मालेगाव या ठिकाणी मंजूर करण्यात आले आहेत. सदर अंदाजपत्रकांची रक्कम १३३०.०९ लक्ष असून सदर प्रस्ताव मालेगांव मंडल कार्यालयाकडून राज्यस्तर आदिवासी उपाययोजनेअंतर्गत प्रशासकीय मंजुरी व निधी मागणीसाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, नाशिक या कार्यालयास सादर करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भद्रावती येथील पुनर्वसित कुनाडा गावातील ५५ कुटूंबाच्या घरांची**
**वीज कोणतीही पूर्वसूचना न देता कापली असल्याबाबत**

**(२९) ६९०१४ (२७-०९-२०२३). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.माधवराव पवार (हदगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भद्रावती येथील पुनर्वसित कुनाडा गावातील ५५ कुटूंबाच्या घरांची वीज कोणतीही पूर्वसूचना न देता कापली असल्याने संपूर्ण गाव काळोखात गेला असून त्वरीत वीज सुरु न केल्यास, येथील नागरीकांनी आंदोलन करण्याचा इशारा माहे मे,२०२३ रोजी वा त्यासुमारास दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरणने कुनाडा गावातील ५५ कुटूंबांना २ लाखांच्या वर वीजबील पाठविल्याची धक्कादायक बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कुनाडा गावातील ५५ कुटूंबाची कापलेली वीज पुर्वत सुरु करुन वीजदेयक पाठविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०४-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.
महावितरणने फक्त अनधिकृतरित्या विद्युत वापर करणाऱ्या लोकांचा विद्युत पुरवठा खंडीत केलेला आहे.

कुनाडा गावातील अनाधिकृतपणे विद्युत वापर करणाऱ्या ३८ लोकांपैकी फक्त एका ग्राहकाला त्याच्या वीज वापराप्रमाणे रु. २,६७,३८०/- रुपयाचे वीज देयक पाठविण्यात आलेले आहे.

(३) अनाधिकृतपणे विद्युत वापर करणाऱ्या लोकांनी दिलेली देयक न भरल्यामुळे व वीज जोडणी प्रक्रिया पूर्ण न केल्यामुळे त्याचा विद्युत पुरवठा सुरु करण्यात आलेला नाही. वीज देयकाचा भरणा केल्यानंतर उर्वरित ग्राहकांना अधिकृत वीज जोडणी देण्यात येईल. सद्यस्थिती कुनाडा गावातील सर्व अधिकृत ग्राहकांचा वीज पुरवठा सुरळीत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे, मुलुंड, तळेगाव खारघर व नवी मुंबई येथे विदयुत पुरवठा खंडित झाल्याबाबत

**(३०) ६९३२७ (२६-०९-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ठाणे, मुलुंड, तळेगाव खारघर व नवी मुंबई येथे दिनांक १९ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास विदयुत पुरवठा तीन तास खंडित झाल्यामुळे नागरिकांचे हाल झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदयुत पुरवठा खंडित होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली तसेच विदयुत पुरवठा अखंडित होणासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) सदर भागात दि. १९ एप्रिल, २०२३ रोजी दुपारी १३.५५ वाजता ४०० के.व्ही. तळेगाव-खारघर उच्चदाब वाहीनी टॉवर क्र. १०२ व १०३ याठिकाणी आग लागल्यामुळे नादुरुस्त झाली होती. महापारेषणच्या राज्य भारप्रेषण केंद्र कळवा यांच्या निर्देशानुसार ४००/- के.व्ही. ई.एच.व्ही. खारघर, २२०/२२ के.व्ही. महापे ई.एच. व्ही. आणि २२०/३३ के.व्ही. सोनखार, १००/२२ के.व्ही. ई. एच.व्ही. नोसील, २२०/२२ के.व्ही. भांडुप जी. आय. एस., २२०/२२ के.व्ही. मुलुंड ई.एच.व्ही. आणि २२०/२२ के.व्ही. कलरकेम विद्युत उपकेंद्रातून निघणाऱ्या वाहीन्यांवर साखळी पध्दतीने आपत्कालीन विद्युत भारनियमन करण्यात आले. त्यामुळे सदर भागात खंडित वाहिन्यांचा सरासरी कालावधी २८ मिनिट ते ०१ तास ५३ मिनिट या कालावधी पर्यंत विद्युत पुरवठा खंडित झाला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ओझर-तिवरे (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील मधली तरळवाडी येथील वीज खांब जीर्ण झाल्याबाबत

**(३१) ६९५५२ (२७-०९-२०२३). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ओझर-तिवरे (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील मधली तरळवाडी येथील गंजलेल्या वीजखांबामुळे लगतच्या घरांसह ग्रामस्थांच्या जिवितास धोका पोहोचण्याची शक्यता असल्याने सदरचे वीजखांब तात्काळ बदलण्यात यावे अशी मागणी ग्रामस्थांनी माहे जून, २०२३ मध्ये व तद्पूर्वी वारंवार महावितरण विभागाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावातील अनेक ठिकाणी वीजेच्या खांबाचा जमिनीकडील भाग पूर्णपणे गंजलेले असल्याने सदर खांब नारळाच्या झाडाला बांधून ठेवण्याची वेळ आली असून पावसाळयात, वादळी वा-यात हे खांब पडून जीवित हानी होण्याची शक्यता निर्माण झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गंजलेल्या खांबाबाबत तात्काळ दखल घेण्यात न आल्यास उपोषण करण्याचा इशारा ग्रामस्थांनी महावितरण विभागाच्या अधिका-यांना देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ग्रामस्थांच्या मागणीच्या अनुषंगाने ताताडीने गंजलेले वीजेचे खांब बदलण्याच्या अनुषंगाने काय कार्यवाही करण्यात आली वा खांब बदलण्यास टाळाटाळ करणाऱ्या महावितरणच्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०४-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.
मौजे ओझर तिवरे, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील मधली तरळवाडी अंतर्गत ग्राहकांनी श्री. दत्तात्रय यशवंत सुद यांच्या जमिनीतील पोल गंजून जीर्ण झाला असल्याचे व तो धोकादायक असल्याचे निवेदन दि. ०६ जून २०२३ रोजी उपविभागीय कार्यालय, राजापूर-२ येथे दिले होते.
(२) सदर निवेदनाची दखल घेऊन उपकार्यकारी अभियंता (राजापूर-२) यांनी पाहणी केली असता एकूण ५ गंजलेले पोल आढळून आले होते.
(३) हे खरे आहे.
(४) सदर मागणीच्या अनुषंगाने उपकार्यकारी अभियंता (राजापूर-२) यांनी स्वत: पाहणी केली तसेच श्री. दत्तात्रय यशवंत सुद यांच्या जमिनीतील गंजलेला पोल तात्काळ बदलण्याबाबत संबंधित शाखा अधिकारी यांना सुचना दिल्या. त्यानुसार शाखा अधिकारी, ओणी यांनी गंजलेला पोल देखभाल दुरुस्तीअंतर्गत बदलेला आहे. उर्वरित पोल दि. १३.०७.२०२३ पर्यंत बदलण्याचे काम पुर्ण झाले आहे.
सदर काम ग्रामस्थांचे निवेदन प्राप्त झाल्यानंतर तात्काळ केलेले असल्याने याबाबत कोणत्याही अधिकारी/कर्मचारी यांनी हलगर्जीपणा केलेला नाही. त्यामुळे कोणावरही कारवाई करण्यात आलेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मौजे नांदरुख, (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील कांही ग्रामस्थांवर चिरेखाणीवर विज चोरी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आल्याबाबत

**(३२) ६९५८६ (२७-०९-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे नांदरुख, (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील कांही ग्रामस्थांवर चिरेखाणीवर विज चोरी केल्याप्रकरणी कणकवली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, माहे मे, २०२१ ते माहे मार्च, २०२३ या वर्षामध्ये किती युनिट विज चोरी केली आहे व त्यांच्याकडून विदयुत वितरण कंपनीने आतापर्यंत विज चोरी प्रकरणी किती दंड आकारण्यात आला आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०२४) :** (१) व (२) बाबत,
मौजे नांदरुख, (ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग) येथील एका ग्राहकावर वीजचोरी केल्याप्रकरणी कणकवली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महावितरण कंपनीच्या सुरक्षा व अंमलबजावणी कल्याण परिक्षेत्र अंतर्गत सिंधुदुर्ग भरारी पथकाने दि. १८.०४.२०२३ रोजी श्री. अरुण गोविंद चव्हाण (जागामालक) तथा श्री. रामचंद्र गोंविद चव्हाण (वापरकर्ते) ग्राहक क्रमांक २३४६३००००३४८३ यांच्या सर्वे नं. १२७ (२३३) नांदरुख, मालवण स्थित चिरेखाणी युनिटच्या विद्युत मीटरची तपासणी केली होती तपासणीवेळी ग्राहक मीटरशी छेडछाड करुन वीजचोरी करीत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे उक्त ग्राहकास विद्युत कायदा २००३ मधील कलम १३५ नुसार ६१५५० युनिटचे रक्कम रु.१०,८८,५०२/- वीजचोरी निर्धारण रक्कमेचे देयक देण्यात आले.

ग्राहकाने वीजचोरी निर्धारण रक्कम रु. १०,८८,५०२/- दि. २७.०४.२०२३ रोजी महावितरण कंपनीकडे भरणा केला. तथापि ग्राहकाने तडजोड रक्कम न भरल्यामुळे भरारी पथक, सिंधुदुर्ग यांनी जागामालक व वापरकर्ता यांचेविरुद्ध प्रथम गुन्हा अहवाल (FRI) नोंदविला. गुन्हा नोंद झाल्यानंतर त्यांनी दिनांक ०७.०६.२०२३ रोजी तडजोड रक्कम रु. ७,६०,०००/- चा भरणा महावितरण कंपनीकडे दिनांक १५.०६.२०२३ रोजी केला आहे.
(३) माहे मे २०२१ ते मार्च २०२३ या कालावधीमध्ये ६१५५० युनिटची वीजचोरी उघडकीस आलेली असून ग्राहकांना निर्धारण रक्कम रु. १०,८८,५०२/- चे देयक देण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहराची तहान भागविण्यासाठी मुळशी धरणातील पाणी वापरण्याबाबत

**(३३) ६९५९४ (०३-०९-२०२३). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील टाटा पॉवर कंपनीकडून भिरा जलविदयुत केंद्रात विज निर्मिती केल्यानंतर समुद्रात सोडण्यात येणारे मुळशी धरणातील पाणी पिण्याच्या पाण्यासाठी वापरण्याचा पर्याय सुचविण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुळशी ते खडकवासला या मार्गात पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप (पीपीपी) तत्त्वावर १८ किलोमीटर लांबीचा बोगदा बांधणे किंवा मुळशी धरणाखाली आणखी एक धरण बांधण्याची योजना शासनाने नेमेलेल्या समितीने सुचविली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य शासनाने शासन निर्णय दि.०२/०८/२०१९ अन्वये कोयना जलविद्युत प्रकल्प व टाटा जलविद्युत प्रकल्प समुहातुन वीज निर्मितीसाठी कृष्णा खोऱ्यातून विपुलतेच्या खोऱ्यात (कोकण) वळविण्यात येणारे पाणी टप्प्या-टप्प्याने कमी करण्याकरिता गठित भावे समितीच्या अहवालावर अभ्यास करून पुढील धोरण व कार्यवाहीची दिशा निश्चित करण्याबाबत तज्ञ समिती (सुर्वे समिती) गठित केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, गठित करण्यात आलेल्या समितीने अहवाल शासनास सादर केला आहे काय, समितीच्या शिफारशी काय आहेत, त्याअनुषंगाने समितीने सुचविलेली योजना अंमलात आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०४-२०२४) :** (१) राज्य शासनाने शासन निर्णय क्र. संकीर्ण- २०१८/ (१२६/२०१८) / जसंअ दि. २ ऑगस्ट २०१८ अन्वये कोयना जलविद्युत प्रकल्प व टाटा जलविद्युत प्रकल्प समूहास वीज निर्मितीसाठी कृष्णा खो-यातून विपुलतेच्या खोऱ्यात वळविण्यात येणारे पाणी टप्या टप्प्याने कमी करण्याकरिता अभ्यास करण्यासाठी अभ्यास गट (भावे समिती) गठीत करण्यात आलेला होता व या समितीचा अहवाल दिनांक १०/०५/२०१९ रोजी शासनास सादर करण्यात आला होता.
या अहवालावर अभ्यास करून पुढील धोरण व कार्यवाहीची दिशा निश्चित करण्याबाबत राज्य शासनाने शासन पत्र क्र. संकीर्ण- २०१९/प्र.क्र.८१/१९/जसंअ, दिनांक ०२/०८/२०१९ अन्वये तज्ञ समिती (सुर्वे समिती) गठित केली आहे. अद्यापपर्यंत सदर समितीच्या अकरा बैठका झाल्या असुन पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.
(२) मुद्या क्र. १ मध्ये नमूद तज्ञ समितीचा अंतिम अहवाल शासनास सादर झाल्यानंतर पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.
(३) होय, हे खरे आहे.
(४) समितीचा अहवाल अद्याप शासनास सादर झालेला नसल्याने प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंधुदुर्ग जिल्हयात अंमली पदार्थाची विक्री दिवसेंदिवस वाढत असल्याबाबत

**(३४) ६९६५१ (०३-०९-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयात अंमली पदार्थाची विक्री दिवसेंदिवस वाढत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदेशी पर्यटक सिंधुदुर्ग जिल्हयात गुगल मॅपच्या सहाय्याने ड्रग्ज एजंटपर्यंत पोहचत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नजीकच्या गोवा राज्यात अंमली पदार्थाविरोधात मोहीम हाती घेतल्याने गेल्या कांही दिवसांपासून विदेशी पर्यटक सिंधुदुर्गला आपला रेव्ह पार्टिचा अडडा बनवित असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याप्रकरणी चौकशी करुन जिल्हयातील अंमलीपदार्थ विक्रीला आळा घालण्याच्यादृष्टिने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२४) :** (१),(२) व (३) हे खरे नाही.

(४) अंमली पदार्थांची विक्री तसेच वाहतूक होऊ नये या करीता गोवा तसेच कर्नाटक राज्याच्या सीमेलगत असलेल्या पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी तसेच अंमलदार यांना त्याबाबत सक्त सूचना देण्यात आलेल्या आहेत. जिल्हयाच्या सिमेलगतचे भागात बांदा, सावंतवाडी, वेंगुर्ला व दोडामार्ग हद्दीतून जाणारे बॉर्डरवर बांदा, सातार्डा, आरोंदा, रेडी, बिजघर एकूण ५ चेक पोस्ट उभारण्यात आलेले असून त्या ठिकाणी २४ तास अधिकारी व अंमलदार हे अंमली पदार्थाची अवैध वाहतुक होऊ नये याकरीता ये जा करणारे वाहनांची तसचे पर्यटकांची तपासणी करीत असतात.

जिल्हयामध्ये अंमली पदार्थाची तस्करीचे संबधाने चेक पोस्ट फायंडींग स्कॉड तयार करण्यात आलेले असून त्यामध्ये १ स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी, २ महिला पोलीस अंमलदार, नायब तहसिलदार, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी, कर्मचारी आहेत. तसेच जिल्हा स्तरावर अँटी नार्कोटीस सेल निर्माण करण्यात आलेला असून त्यामध्ये २ अधिकारी व ५ अंमलदार कार्यरत आहेत.घटकामध्ये जिल्हास्तरीय अंमली पदार्थ विरोधी कार्यकारी समिती व नार्को को. ऑर्डीनेशन बैठक दर महिन्यात आयोजित करण्यात येऊन त्यामध्ये अंमली पदार्थाचा वापर रोखण्यासाठी सर्व विभागामध्ये समन्वय ठेऊन व्यापक जनजागृती मोहिम राबविण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकृषिकच्या अन्यायकारक वर्गवारीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांची वीजबीले दुरुस्त करुन मिळणेबाबत

**(३५) ७०११६ (०६-१०-२०२३). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ३ जुलै २०१५ च्या Revision in Electricity Tariff (No.PR-३/Tariff/२७६४१) प्रमाणे शेती पंपाच्या १) LT-IV (B) LT Agriculture, २) LT-IV (C) Ag other. अशा दोन वर्गवारी करण्यात असून लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केलेला पाठपुरावा आणि शेतकऱ्यांची रास्त मागणी ही बाब पाहता यासंदर्भात वीज नियामक आयोगाकडील सुनावणीनंतर ही वर्गवारी बदलण्यात येऊन सर्व शेती पंपाची वर्गवारी शेती या सदरात समाविष्ट करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वर्गवारी जरी शेती सदरात करण्यात आली असली तरी सन २०१८ मध्ये सन २०१६ पासूनचा फरक वसूल करण्यात आला असुन सन २०१८ ते सन मार्च २०२३ पर्यंतची जादा आकारणी तशीच ठेवण्यात आली, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, Ag other च्या अन्यायकारक वर्गवारीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांची वीजबीले दुरुस्त करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०२४) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

मा. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाच्या वीजदर आदेश क्र. १२१/२०१४ दि. २६.०६.२०१४ व त्यानंतरच्या वीजदर आदेशान्वये "कृषी इतर" वर्गवारी अंतर्गत निर्धारीत फुलशेती, फळबाग, रोपवाटिका (नर्सरी), वृक्षारोपण यासह अन्य ग्राहकांना "कृषी इतर" वर्गवारीनुसार वीजदर आकारणी दि. ३१.०३.२०२३ पर्यंत करण्यात येत होती. तद्नंतर मा. आयोगाच्या वीजदर आदेश क्र.२२६/२०२२ नुसार दि. ०१.०४.२०२३ पासून फुलशेती, फळबाग, रोपवाटिका (नर्सरी), वृक्षारोपण या ग्राहकांना "कृषी " वर्गवारी अंतर्गत वीजदर आकारणी करण्यात येत आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्ह्यातील धामणी प्रकल्पाच्या बॅक वॉटर मधून नियोजित दुर्गमानवाड उपसा जलसिंचन योजना कार्यान्वित करण्याबाबत

**(३६) ७०६५५ (१०-१०-२०२३). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील जामणी मध्यम प्रकल्पाचे बॅक वॉटर मधून डोंगर माथ्यावरील कोरडवाहू क्षेत्र ओलीताखाली आणण्यासाठी दुर्गमानवाड, तळगाव, पडसाळी, आपटाळ, कात्रेवाडी, डिगेवाडी, पी व इतर वाड्या-वस्त्यातील अंदाजे १५०० हेक्टरहून अधिक क्षेत्र ओलीतीखाली आणण्यासाठी उपसा सिंचन योजना प्रस्तावित करण्यासाठीची मागणी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास उपमुख्यमंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धामणी धरणाच्या बॅकवॉटरमधून दुर्गमानवाड (ता. राधानगरी, जि. कोल्हापूर) येथे उपसा जलसिंचन योजना प्रकल्प केल्यास या परीसरातील १० ते १५ गावे व वाड्या-वस्त्यांतील शेकडो हेक्टर क्षेत्र ओलीताखाली येईल हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर योजना कार्यान्वीत करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत?

**श्री. संजय राठोड (२३-०२-२०२४) :** (१) व (२) होय. हे खरे आहे.
(३) यासंदर्भात दि.१५/०९/२०२२ रोजीच्या मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या समवेत झालेल्या बैठकीतील मुद्यांस अनुसरुन राधानगरी मतदार संघातील नियोजित दुर्गमानवाड उपसा सिंचन योजनेच्या सर्वेक्षणाच्या कामास मान्यता मिळाली आहे. तथापि सर्वेक्षणा दरम्यान ग्रामस्थांनी मागणी केल्यानंतर योजनेचे लाभक्षेत्र ६०० हेक्टरपेक्षा जास्त होत असल्याने मा.विधानसभा सदस्यांनी सदर योजना जलसंपदा विभागाकडून करणेबाबत निवेदन दिले आहे.

तथापि जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, कोल्हापूर यांच्याकडून सविस्तर सर्वेक्षण व अन्वेषणावर आधारित अचूक पाण्याची मागणी प्राप्त झाल्यानंतर, सदर योजनेस पाणी उपलब्धता प्रमाणपत्र देण्याबाबतचा आवश्यक प्रस्ताव सक्षम स्तरावरील मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.

प्रस्तुत योजनेच्या सर्वेक्षण कामास जलसंधारण विभागाच्या शासन निर्णय दिनांक ०९/११/२०२२ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून त्याद्वारे जलसंधारण विभागामार्फत सर्वेक्षणाची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मु.पो.ता. वाडा ( जि. पालघर ) येथील कुडूस परिसरात पोलीस स्टेशन मंजूर करण्याबाबत**

**(३७) ७०९४७ (२७-०९-२०२३). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.पो.ता. वाडा ( जि. पालघर ) येथील कुडूस परिसरात औद्योगिकरणामुळे लोकसंख्या वाढल्याने बेरोजगारी पण वाढली त्यामुळे गुन्हेगारीच्या घटनां मध्ये वाढ झाल्याचे माहे एप्रिल, २०२३, मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुडूस हे गाव भिवंडी - वाडा या २ शहरा मध्ये येत असल्याने ५२ गावांची मुख्य बाजार पेठ असून २२ गावे, ४० पाडे याचा अंतर्भाव असल्याने या परिसराच्या कायदा सुव्यवस्थे करता स्वतंत्र पोलीस स्टेशनची वारंवार मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कुडूस परिसरात असंख्य उद्योग नव्याने उभे राहत असल्याने वाढत्या लोक संख्येने गुन्हेगारी मध्ये झालेली प्रचंडवाढ व पोलीस बळ अपुरे असल्याने नवीन पोलीस स्टेशन उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०३-२०२४) :** (१) होय,

पालघर पोलीस घटकातील वाडा पोलीस ठाणे अंतर्गत कुडूस दूरक्षेत्र आहे. वाडा पोलीस ठाणे येथे जानेवारी २०२३ ते एप्रिल २०२३ पर्यंत एकूण ५८ गुन्हे दाखल आहेत.

(२) प्रभारी अधिकारी, वाडा पोलीस ठाणे यांनी नव्याने कुडूस पोलीस ठाणे निर्माण करण्याचा प्रस्ताव सादर केला असून, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयामार्फत प्रस्ताव शासनास सादर करण्यात येणार आहे.

(३) उक्त प्रस्ताव अद्याप शासनास अप्राप्त आहे. प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार तपासून, पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात ठाणे जिल्हयातील मीरा भाईंदर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यासाठी महिला सहायता कक्ष नसल्याबाबत**

**(३८) ७१०१० (०३-०९-२०२३). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ठाणे जिल्हयातील मीरा भाईंदर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यासाठी येणाऱ्या महिलांना सन्मानाची वागणूक मिळावी यासाठी सहा पोलीस ठाण्यात महिला सहायता कक्ष उभारण्यात आले असून मात्र विविध पोलिस ठाण्यात महिला सहायता कक्ष नसल्याचे माहे एप्रिल, २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे , हे खरे आहे काय,

(२)असल्यास महिला सहायता कक्ष नसल्याने येणाऱ्या महिलाना पुरुष ठाणे अमलदार पुरुष अधिकारी) यांना भेटून अडचण सांगावी त्यातही तक्रारीसाठी येणाऱ्या महिलाना त्याचे म्हणणे समजून न घेता ताटकळत थांबवले जाते, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, तत्कालीन पोलीस आयुक्तांनी प्रत्येक पोलीस ठाण्यात महिलांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी महिला सहायता कक्ष उभारण्याचे नमूद असतानाही त्याची अमलबजावणी करण्याची सर्वसाधारण कारण काय आहेत,

(४)असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५)नसल्यास, विलांबची कारण काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-११-२०२३) :** (१) मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयामध्ये महिलांना सन्मानाची वागणूक मिळावी व त्यांच्या तक्रारींचे निरसन व्हावे याकरिता सर्व पोलीस ठाण्यामध्ये महिला सहायता कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. तसेच प्रत्येक पोलीस ठाण्यात महिला पोलीस अधिकारी व महिला पोलीस अंमलदार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील प्रत्येक परिमंडळ स्तरावर महिलांच्या तक्रारींचे निरसन व्हावे व त्यांना लागलीच मदत करण्यासाठी स्वतंत्र भरोसा सेलची स्थापना करण्यात आली आहे.

(२) मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालया अंतर्गत सर्व पोलीस ठाण्यांमध्ये महिला सहायता कक्ष असल्याने महिलांची तक्रार महिला पोलीस अधिकारी/अंमलदार घेत असतात.

(३) मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये महिलांसाठी स्वतंत्र महिला सहायता कक्ष उभारण्यात आले आहेत .

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माढा जि.सोलापूर येथील मंजूर खैराव-मानेगांव उपसा सिंचन योजना राबविण्याबाबत**

**(३९) ७१०३२ (१०-१०-२०२३). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माढा (जि.सोलापूर) तालुक्यातील पुर्व भागातील खैराव मानेगांव,धानोरे, बुद्रुकवाडी, कापसेवाडी हटकरवडी या गावांना अनेक वर्षापासून पाण्याचा अभाव आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिना नदीवरुन खैराव-मानेगांव उपसा सिंचन योजना होण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी सन २०२० मध्ये शासनाकडे पत्र देऊन मागणी केली होती त्याअनुषगाने माहे जुन २०२१ मध्ये तत्कालीन जलसंपदा मंत्री यांनी बैठक घेऊन सर्व्हे करण्यास मान्यता दिली असून माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडून प्रस्तावित योजनेच्या सर्व्हेक्षणास मंजूरी देण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतचा पूर्व व्यवहार्यता अहवाल महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाकडून शासनास सादर झाल्यानंतर अंतिम अहवालास मंजूरी देण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री यांचेकडे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान मंजूरी देण्याची मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, खैराव-मानेगांव उपसा सिंचन योजनेतील खैराव,मानेगांव,धानोरे, बुद्रुकवाडी, कापसेवाडी/हटकरवाडी या गावांतील ५०६७ हे. क्षेत्रासाठी खैराव - मानेगांव उपसा सिंचन योजना क्षेत्रासाठी भीमा-सीना जोड कालव्या मधून ७३०.४८ द.ल.घ.फु.इतके पाण्याची बचत होत असल्याने सदर पाणी प्रस्तावीत खैराव-मानेगांव उपसा सिंचन योजनेसाठी वापरता येणे शक्य असून त्याचा संकल्पन सर्वसाधारण आराखडा तयार आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, खैराव येथील को.प.बंधाऱ्यामधून पाणी उचलून उर्ध्वगामी नलिकाव्दारे सोडण्यात येणार असल्याने बंदिस्त नलिका वितरण प्रणालीव्दारे ५०६७ हे. क्षेत्रास आठमाही पाणी उपलब्ध होणार असल्याने शासनाने दि. ०३ एप्रिल, २०२३ रोजी मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, कायम दुष्काळी भागातील लोकांचा पाण्याचा कायम स्वरुपी प्रश्न सोडवण्यासाठी सदर योजना राबविणेच्या दृष्टीने तसेच योजनेस निधीची तरतुद करण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०४-२०२४) :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) होय, अंशतः खरे आहे.

प्रदेश कार्यालयाचे दि. २५/०१/२०२४ रोजीचे पत्रान्वये सदर योजनेच्या सवसाधारण आराखड्यास मान्यता देणेत आली आहे.
(५) होय. दि.०३/०४/२०२३ रोजी प्रस्तावित योजनेच्या पुर्व व्यवहार्यता अहवालास शासनाने मंजूरी दिली आहे.
(६) प्रदेश कार्यालयाचे दि.२५/०१/२०२४ रोजीचे पत्रान्वये सदर योजनेच्या सर्वसाधारण आराखड्यास मान्यता देणेत आली आहे. प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर करणेत येत आहे. योजनेस प्रशासकिय मान्यता प्राप्त झाल्यानंतर योजनेसाठी निधीची तरतूद करण्यात येईल.

---

**माढा (जि.सोलापूर) येथे वाढीव ट्रान्सफार्मर व नवीन सबस्टेशन करण्याबाबत**

**(४०) ७१०३६ (२७-०९-२०२३). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील माढा मतदारसंघामध्ये वीजेच्या अनेक समस्या असून पुरेशा दाबाने शेतकऱ्यांना वीज पुरवठा होत असून सध्या ६ तासापेक्षा कमी वीज पुरवठा होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गावांमधील वारंवार रोहित्रे जळणे, तारा तुटणे अशा घटना सातत्याने घडत असल्याने ऊस, केळी, फळबागा यासह इतर पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याने वीज पुरवठा सुरळीत व्हावा याबाबत स्थानिक शेतकरी व ग्रामस्थ यांचेकडून माहे जून,२०२३ मध्ये रास्ता रोको आंदोलन करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतकऱ्यांना पुरेशा दाबाने वीज मिळणेसाठी माढा मतदारसंघातील पडसाळी, अरण, भेंड, वरवडे, परीते ता.माढा या ठिकाणी ३३/११ के.व्ही उपकेंद्र कार्यरत असून त्या ठिकाणी नवीन ५ एम.व्ही.ए. ट्रान्सफार्मर बसविण्यासाठी तसेच जाधववाडी (मो)/बैरागावाडी,घोटी,बावी ता.माढा तसेच चिलाईवाडी ता.पंढरपूर व जांभूड ता.माळशिरस या ठिकाणी नवीन ३३/११ के.व्ही. सबस्टेशन करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधीं यांनी वारंवार स्थानिक प्रशासन व शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना वीज पुरवठा सुरळीत मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०३-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.
मौजे बावी, ता. माढा येथील सुमारे १५० ते २०० ग्रामस्थांनी शेटफळ-कुरुलवाडी रस्त्यावर दि. १०.०६.२०२३ रोजी रास्ता रोको आंदोलन केले होते.
(३) हे खरे आहे.
याबाबत मा. विधानसभा सदस्य (माढा) यांनी दि.१६.०७.२०२३ अन्वये मा. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री महोदयांकडे निवेदन सादर केले आहे.
(४) सदर निवेदनाच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना सुरळीत वीज पुरवठा करण्यासाठी केंद्र शासनाच्या सुधारीत वितरण क्षेत्र योजना (RDSS) अंतर्गत तांत्रिक सुसाध्यतेची आवश्यकता तपासून नवीन उपकेंद्र व अतिरिक्त पॉवर ट्रान्सफॉर्मरची पायाभूत सुविधा प्रस्तावित करण्यात आली आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे हावरगा (ता.देगलुर, जि.नांदेड) येथे कोल्हापूरी बंधाऱ्याच्या कामामध्ये अधिकारी आणि ठेकेदार यांनी अनियमितता केल्याबाबत**

**(४१) ७१०४६ (३१-०८-२०२३). श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे हावरगा (ता.देगलुर, जि.नांदेड) येथे कोल्हापूरी बंधाऱ्याच्या कामामध्ये बंधाऱ्याचे काम अर्धवट करुन अधिकारी व ठेकेदार यांनी संगनमताने रुपये ९० लक्ष रुपयाचे देयकाची उचल केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१३-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.

मौ. हावरगा, ता.देगलूर, जि.नांदेड येथील कोल्हापूरी बंधाऱ्याचे काम दिनांक ३१/०७/२०११ रोजी पुर्ण झाले असून सदर बंधाऱ्यामुळे १३० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड विधानसभा क्षेत्रातील मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने कोल्हापुरी/ सिमेंट नाला बंधाऱ्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(४२) ७१४२३ (३१-०८-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड विधानसभा क्षेत्रातील बीड व शिरुर या तालुक्यांमध्ये मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे सन २०२१-२२, २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये मंजुरीसह प्रत्यक्ष कामास सुरूवात केलेली आहे. सदर बंधाऱ्याच्या कामाबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधी, ग्रामस्थ व शेतकरी वर्गाकडून वारंवार तक्रारी करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राटदाराने कोल्हापुरी पद्धतीचे बंधाऱ्यांची कामे निकृष्टरित्या चालूच ठेवलेली आहेत. अशा निकृष्ट कामामुळे शासनाच्या पैशाचा अपव्यय होवून ऐन पावसाळ्यामध्ये बंधारा फुटण्याच्या प्रकारामुळे मोठ्या प्रमाणावर शेतीचे नुकसान व मानवहानी होण्याची शक्यता असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच कृष्णाई कन्स्ट्रक्शन व इतर कंत्राटदारांनी आडगाव १ व २, वडगाव २, बोरदेवी १, वडगाव ३, नवाबपुर १, केसापुरी २, परभणी २, दगडी शहाजानपुर १, जाधववाडी ३ व ४, अंथरवणपिंप्री १ व २, पिंपळवाडी ४ व ७, धनगरवाडी १, पारगाव सिरस २, वानगाव १, बेलुरा २ व दोन्ही तालुक्यातील गावामध्ये कोल्हापुरी बंधाऱ्याची गुणवत्ता नियंत्रण विभागामार्फत विशेष लेखा परिक्षणाची मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार उक्त ठिकाणी कोल्हापुरी/सिमेंट नाला बंधाऱ्याचे बांधकाम चांगल्या दर्जाचे होण्याबाबत तसेच सदर बंधाऱ्याची गुणवत्ता नियंत्रण विभागामार्फत विशेष लेखा परिक्षण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१७-१०-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सदरील कामे शासनाने विहीत केलेल्या संधानकिय चाचण्या घेऊन योग्य गुणवत्तेची केलेली आहेत. बंधारे फुटून मोठ्या प्रमाणात शेतीचे नुकसान व मानवहानी होण्याची कोणतीही शक्यता निदर्शनास आलेली नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

मा.विधानसभा सदस्य यांच्या दिनांक ०९/०५/२०२३ व ११/०५/२०२३ च्या तक्रार पत्रात पारगाव सिरस-१, वानगाव, बेलुरा-२ या कामांचा नावानिशी समावेश दिसून येत नाही.

(४) सदर प्रकरणी विभागीय कार्यालयामार्फत दोन उपविभागीय अभियंता यांची चौकशी समिती स्थापन करून पुर्ण झालेल्या ११ कामांचा सविस्तर अहवाल दिनांक ०३/०७/२०२३ रोजी प्राप्त झालेला आहे. सदर अहवालानुसार ११ बंधाऱ्यांची कामे तांत्रिक दृष्ट्या योग्य व तांत्रिक मानकानुसार दर्जेदार रित्या पुर्ण झालेली आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कार नदी प्रकल्पातंर्गत कारंजा व आष्टी तालुक्यातील मुख्य कालव्याचे पाणी शेतकऱ्याना सिंचनाकरिता मिळत नसल्याबाबत

**(४३) ७१४३६ (१४-०९-२०२३). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी येथील कार नदी प्रकल्पातंर्गत कारंजा व आष्टी तालक्यातील शेतकऱ्याच्या शेतीला पाणी मिळण्याच्या उद्देशाने ३३ कि.मी. लांबीचे मुख्य कालवे झाले असुन त्या कालव्याद्वारे ५६०० हेक्टर क्षेत्र सिंचन अपेक्षीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कालव्याचे काम निकृष्ठ दर्जाचे झाले असल्यामुळे तेथील कालव्याद्वारे पाणी फक्त १५ कि.मी. पर्यंत पोहचत असून १५०० हेक्टर सिंचन होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कालव्यांच्या दुरूस्तीसाठी शासनाची मान्यता मिळाली असूनसुध्दा कालव्याचे दुरुस्तेचे काम सुरू झालेले नसल्यामुळे सदर तालुक्यातील १७ गावे सिंचना पासून वंचित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर कामाचे अदांजपत्रकाच्या प्रस्तावास तातडीने मान्यता देण्याबाबत व कालव्याची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०३-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, अंशत: खरे आहे.

कार प्रकल्पाच्या मुख्य कालव्याद्वारे कि.मी. १७ पर्यंत पाणी पोहचत असुन, त्यापुढे टोंगलापूर लघु कालव्याद्वारे सिंचनाकरीता पाणी देण्यात येत आहे. सदर प्रकल्पाद्वारे २००० हे. सिंचन होत आहे. अतीभरावातून तसेच अतिखोदाईतून गेलेल्या कालव्याचे भागात होणाऱ्या पाणी गळती/पाझरामुळे मुख्य कालवा कि.मी.१७ च्या पुढे सिंचन करण्यास अडचण निर्माण झाली आहे.

सदर भागात अस्तरीकरणाचे काम सुरू असुन१० ते २० कि.मी. मध्ये अस्तरीकरणाचे काम मार्च २०२४ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) व (४) होय, अंशत: खरे आहे.

कालव्याचे अस्तरीकरणाचे काम प्रकल्पाच्या मंजुर चतुर्थ सुप्रमामध्ये मान्यता प्राप्त असुन, मुख्य कालवा कि.मी. १० ते २० मधील अस्तरीकरण/आर.सी.सी. ट्रफ ची कामे प्रगतीपथावर आहेत. मुख्य कालवा ६ ते १० कि.मी. ची कामे निविदा प्रक्रियेत आहे. तसेच कि.मी. २० ते ३३ चे अंदाजपत्रक तयार करण्याचे काम क्षेत्रीय स्तरावर प्रगतीपथावर आहे. सदर कामे पुर्ण होताच कारंजा व आष्टी तालुक्यातील १७ गावांना जून २०२४ अखेर पर्यंत सिंचनाचा लाभ देणे नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नागपूर येथील एडीएन फार्मासीटीकल कंपनी मध्ये केलेला गैरव्यवहाराबाबत

**(४४) ७१४९१ (२६-०९-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील ॲड. निलेश गायकवाड व कु. मधुलिका बागडे यांनी एडीएन फार्मासीटीकल कंपनी मध्ये केलेला गैरव्यवहार तसेच खोटे खरेदी विक्री पेपर तयार करुन शासनाच्या लोखो रुपयांच्या महसुलाचे नुकसान केले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास यासंदर्भात श्रीमती पल्लवी जयवंत चोपडे यांची खोटे कागदपत्रे तयार करुन लाखाने पैसे घेतले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास श्रीमती पल्लवी जयवंत चोपडे यांनी दिनांक १५ जून, २०२३ रोजी पाचपावली, नागपुर शहर येथे तक्रार दाखल केली असून अद्यापही या संदर्भात पोलिसांकडून ॲड. निलेश गायकवाड व कु.मधुलिका बागडे यांना अटक करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबधित दोषीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१२-२०२३) :** (१) एडीएन फार्मासीटीकल ॲण्ड हेल्थ केअर इंडीया प्रा. लि. ही कंपनी विकत घेणे, सदर कंपनीकरिता माल खरेदी करणे, फार्मसी विकत घेणे, फार्मसी मध्ये लागणारे साहित्य, औषधे विकत घेणे इ. करिता डॉ. पल्लवी चोपडे यांची खोटे कागपपत्रे तयार करून त्याद्वारे निलेश गायकवाड व डॉ. मधुलिका बागडे यांनी रु. ९९,४९,००२/- इतक्या रकमेची फसवणूक केली असल्याबाबत डॉ. पल्लवी चोपडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पाचपावली पोलीस स्टेशन, नागपूर शहर येथे पोलीसांनी गुन्हा क्रमांक ७१३/२०२३ दाखल केला आहे.

सदर गुन्ह्यामध्ये शासन महसुलाचे नुकसान झाल्याचे पोलीस तपासामध्ये निष्पन्न झाले नाही.

(२) होय. डॉ. पल्लवी चोपडे यांची खोटया कागदपत्रांच्या आधारावर एकुण ९९,४९,००२/- रुपयांची फसवणूक झाली आहे.

(३) व (४) डॉ. पल्लवी चोपडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पाचपावली पोलीस स्टेशन, नागपूर शहर येथे पोलीसांनी भादवि कलम ४०६,४२०,४६७,४६८,४७१,३४ नुसार दिनांक १५ जून, २०२३ रोजी गुन्हा क्रमांक ७१३/२०२३ दाखल केला आहे.

सदर गुन्ह्यातील आरोपी डॉ. मधुलिका बागडे हिला मा. न्यायालयाकडून अटकपूर्व जामीन मंजूर करण्यात आला असून आरोपी निलेश गायकवाड याचा पोलीसांकडून शोध घेण्यात येत आहे. गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात व जिल्ह्यात स्वाधार योजनेच्या धर्तीवर इतर मागास प्रवर्ग विद्यार्थ्यांना लाभ देण्याबाबत

**(४५) ७१४९२ (२९-०८-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) : तारांकित प्रश्न क्रमांक ४९५३५ ला दिनांक २३ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात व जिल्ह्यात सामाजिक न्याय विभागाच्या स्वाधार योजनेत शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या पात्र विद्यार्थ्यांच्या खात्यात निवास व भोजनाच्या खर्चाची रक्कम जमा करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याच धर्तीवर इतर मागास प्रवर्गाच्या विद्यार्थी व विद्यार्थीसाठी योजना सुरु करण्याची मागणी होत असताना सन २०२२ मधील हिवाळी अधिवेशनात स्वाधारसारखी योजना सुरु करण्याची घोषणा केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०६-०३-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) आदिवासी विकास विभागाची स्वयंम योजना व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वाधार योजनेच्या धर्तीवर इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती (इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडून भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांकरीता निर्वाह भत्याची पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना कार्यान्वित असल्यामुळे सदर योजनेचा लाभ घेत असलेले /घेणारे भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजाचे विद्यार्थी वगळून) आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रति जिल्हा ६०० या प्रमाणे एकूण २१,६०० विद्यार्थ्यांकरिता "ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना" राबविण्यासाठी दि.१३.१२.२०२३ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राधानगरी (जि. कोल्हापूर) येथील दूधगंगा डावा कालवा नियमिततेबाबत झालेला गैरव्यवहार बांधकाम व अस्तीकरण करण्याच्या कामांमध्ये ठेकेदारास अदा केलेल्या देयकांमधील आर्थिक नियमिततेची चौकशी करून दोशींवर कडक कायदेशीर कार्यवाही करणेबाबत.

**(४६) ७१५१५ (१४-०९-२०२३). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील राधानगरी येथील दुधगंगा डावा कालवा कि.मी. ३२ ते ७६ मधील मातीकाम, बांधकाम व अस्तरीकरण करण्याच्या कामामध्ये ठेकेदारास अदा केलेल्या देयकामध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाली असल्याचे माहे मार्च, २०२३ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दक्षता समितीच्या अहवालास अनुसरुन सदर कामाच्या ४० व्या चालू देयकामधुन रक्कम म्हणून ३.४८,४८,६३९/- इतकी रक्कम वसुलीबाबत संभ्रम निर्माण झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, म.कृ.खो.वि. महामंडळ, पुणे यांनी दिनांक ०९ सप्टेंबर, २०२२ रोजी ज्ञापनद्वारे आर्थिक दायित्व रक्कम रुपये १४३.३९ कोटी इतक्या रक्कमेस मंजुरी दिली आहे. त्यामुळे सदर स्वीकृत निविदा रक्कम १२२४६ फोटो वरून सुधारीत निविदा रक्कम २६६, ३६ कोटी इतकी झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रक्कमेस मंजुरी देताना मंजुरी पत्रामध्ये बाब क्र. ८ (iii) नुसार ठेकेदारास देयकाची रक्कम सुधारित तांत्रिक मान्यतेनंतर देणेबाबतच्या सूचना नियामक मंडळाने घालून दिलेल्या आहेत. तरी देखील दुधगंगा विभाग क्र. १. कार्यकारी अभीयंता यांनी दूधगंगा डावा कालवा कि.मी. ३२ ते ७६ मधील मातीकाम व बांधकाम व अस्तरीकरण कामाचे देयक ठेकेदार कंपनी यांना रु.४००० कोटी रुपयांची देयक नियमबाह्यपणे अदा करुन नियामक मंडळाच्या नियम व अटीचा भंग केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर कामातील कोट्यावधी रुपयांचे देयके अदा केल्या प्रकरणी सहभागी असलेल्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०२३) :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

दुधगंगा डावा कालवा कि.मी. ३२ ते ७६ मधील मातीकाम, बांधकाम व अस्तरीकरणाच्या कामात झालेल्या अनियमिततेचा अहवाल दक्षता पथक, पुणे यांचेकडून दि.०८.०१.२०२१ च्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला. त्याअनुषंगाने कार्यवाही करण्यात येवून कामाच्या देयक क्र.३९ व्या चालु देयकामधून रक्कम रु.३,४८,४८,६३९/- वसुल केली आहे.

(३) होय, हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे दि.०९/०२/२०२२ रोजीच्या ज्ञापनाद्वारे अतिरिक्त आर्थिक दायित्व रक्कम रुपये १४३.३९ कोटी इतक्या रक्कमेस मंजुरी दिली आहे. दूधगंगा डावा कालवा किमी ३२ ते ७६ मधील स्विकृत निविदा किंमत रु.१२२.४६ कोटी इतकी असून मंजुर दायित्वामुळे सदर निविदेची सुधारित किंमत रु.२६६.३६ कोटी इतकी आहे.
(४) होय, हे अंशत: खरे आहे.

महामंडळाच्या दि.०९/०२/२०२२ च्या दायित्व मंजुरीच्या ज्ञापनामधील मुद्दा क्र.८ मधील अट क्र.iii मध्ये "सदर दायित्वाची अदायगी सुधारीत तांत्रिक मान्यतेनंतर करण्यात यावी" असे नमुद केलेले असुनही सुधारीत तांत्रिक मान्यता न घेता दूधगंगा डावा कालवा किमी ३२ ते ७६ मधील मातीकाम व बांधकाम व अस्तरीकरण कामाचे देयक क्र.४० द्वारे ठेकेदार कंपनीस रु.४० कोटीचे देयक अदा केले आहे.
(५) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या दि.२२/०७/२०२३ च्या कार्यालयीन आदेशान्वये तत्कालीन कार्यकारी अभियंता, दूधगंगा कालवे विभाग क्र.१, कोल्हापूर यांचेकडून आहरण व संवितरणाचे वित्तिय अधिकार व IPLA प्रणालीवरील लॉगईन व पासवर्ड वापरण्याचे अधिकार काढून घेण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे शासन आदेश दि.३१/०७/२०२३ अन्वये त्यांना शासन सेवेतून तात्काळ निलंबित केले आहे. तसेच शासन गोपनीय पत्र दि.३१/०७/२०२३ अन्वये प्रस्तुत प्रकरणी दोषींवर कारवाई करणेकामी मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ जळगाव यांची "चौकशी अधिकारी" म्हणुन नियुक्ती करण्यात आली असुन त्यांचेद्वारे चौकशीची कार्यवाही प्रगतीत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिरुर (कासार) (जि.बीड) तालुक्यातील कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांच्या कामात ई-निविदा सूचनेच्या अनुषंगाने कार्यवाही होण्याबाबत

**(४७) ७१५३७ (१२-०९-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड विधानसभा क्षेत्रामधील शिरुर (कासार) तालुक्यातील (जि.बीड) बाळापुर को.प.बं.२, पिंपळगाव मंजरा को.प.बं.२, वानगाव को.प.बं.४, दहिफळ को.प.बं.१, दहिफळ को.प.बं.२, खडकी को.प.बं.१, रौळसगाव को.प.बं.२, साखरे बोरगाव को.प.बं.१, साखरे बोरगाव को.प.बं.२, शिरूर को.प.बं.२, कान्होबाचीवाडी को.प.बं.२, आर्वी को.प.बं.१० बाबतीत जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग बीड यांच्या कार्यालयाकडून ई-निविदा सूचना क्र.बी-१/२ नुसार कार्यवाही झालेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त निविदेतील सदरील गावातील स्थळ पाहणी होत असतांना अनेक गंभीर चुका झालेल्या आहेत. त्याचप्रमाणे या चुकांमुळे शेतीचे व इतर बाबीचे नुकसान होणार आहे. यापूर्वी संबंधित गावकऱ्यांनी, ग्रामपंचायतींनी व तेथील शेतकरी वर्गाने व मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी संबंधित कार्यालयाकडे रितसर तक्रारी तसेच पत्रव्यवहार केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित कार्यालयाकडून तक्रारीची दखल अथवा शहानिशा आजतागायत झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. तसेच शासनाच्या प्रचलित नियमानुसार सदरील ठिकाणावरील पुन:श्च स्थळ पाहणी अहवाल व शेतकरी वर्गाचे नुकसान होणार नाही याबाबतची हमी त्रयस्थ समितीने दिल्याशिवाय सदर निविदेमध्ये पुढील कार्यवाही होणे योग्य होणार नाही अशी मागणी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०७-११-२०२३) :**
(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही ,

जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग बीड अंतर्गत उपविभाग बीड व पाटोदा मार्फत उपरोक्त निविदेतील योजनांचे प्रत्यक्ष स्थळ पाहाणी करुन सविस्तर सर्वेक्षणा अंती व्यवहार्यता तपासुन तांत्रीक दृष्टया योग्य स्थळांची निवड करुन अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत. व त्यास सक्षमस्तरावर प्रशासकीय व तांत्रीक मंजु-या प्राप्त आहेत. स्थळपाहणी होत असताना गंभीर चुका झालेल्या नाहीत. तांत्रीक दृष्टया योग्य स्थळांची निवड करण्यात आलेली आहे. त्यामुळे शेतीचे व इतर बाबीचे नुकसान होणार नाही.

मा.विधानसभा सदस्य, बीड यांची मृद व जलसंधारण विभाग,बीड विभागाकडून ई-निविदा सूचना क्र.बी-१/२ सन २०२३-२४ नुसार कार्यवाही झालेल्या काही कामाबाबत विभागीय कार्यालयास तक्रार प्राप्त आहेत. गावक-यांनी, ग्रामपंचायतीनी व स्थानिक शेतक-यांनी तक्रार केल्याचे दिसुन येत नाही.

३) बीड विभानसभा मतदार संघ यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने प्रकरणाचा वस्तुस्थिती अहवाल विभागीय कार्यालयाने त्यांचे पत्र जा.क्र. तांशा.-१/ ३०६३ दि. २०.०९.२०२३ अन्वये बीड विभानसभा मतदार संघ यांना सादर केले आहे. सदरील अहवालानुसार निविदेतील योजनांचे प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन सविस्तर सर्व्हेक्षण अंती व्यवहार्यता तपासून अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत व योजनांची निविदा कार्यवाही हाती घेण्यापुर्वी सक्षम स्तरावरुन प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेण्यात आली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील एलएसडी स्टॅम्पचा अमली पदार्थ म्हणून होत असलेल्या वापरावर प्रतिबंध करण्याबाबत**

**(४८) ७१५९४ (०१-११-२०२३). श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महाविद्यालयीन तरुण- तरुणी आयटीतील तरुणाई व परदेशी नागरिक मोठ्या प्रमाणावर नशा करण्याकरिता गांजा,एमडी, कोकेनच्या बरोबरीने एलएसडी स्टॅम्पचा वापर करीत असल्याचे धक्कादायक बाब माहे जून २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उद्योगनगरी पिंपरी-चिंचवड व पुणे शहरातील उच्चभ्रू पार्ट्यांमध्ये विद्यार्थी आयटी कंपनीतून तरुण आणि परदेशी नागरिकांकडून स्टॅम्पची खरेदी करण्यात येत असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे-पिंपरी चिंचवड येथे एलएसडी स्टॅम्पचा अमली पदार्थ म्हणून होत असलेल्या वापरावर प्रतिबंध करण्याबाबत व अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांवर अन्न व औषध प्रशासन विभाग पुणे यांच्या वतीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०२-२०२४) :** (१) व (२) पोलीस आयुक्त, पुणे शहर कार्यक्षेत्रामध्ये - सन २०२३ मध्ये चतु:श्रृंगी पोलीस ठाणे येथे एलएसडी स्टॅम्प, ओझेकुश गांजा व एम.डी.एम.ए. च्या गोळया अनाधिकाराने, संगनमताने, बेकायदेशिररीत्या विक्रिकरीता जवळ बाळगल्याचे आढळून आल्याने गु.र.नं. ३५२/२०२३, दिनांक २८.०५.२०२३ रोजी एन.डी.पी.एस. कायदा कलम ८(क), २०(ब)(ii)(अ), २२(क), २९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच येरवडा पोलीस ठाणे येथे अनाधिकाराने, बेकायदेशिररीत्या विक्रिकरीता एल.एस.डी. स्टॅम्प व ऐवज जवळ बाळगल्याचे मिळून आल्याने गु.रं.नं. २४३/२०२३, दिनांक ११.०४.२०२३ रोजी एन.डी.पी.एस. कायदा कलम ८(क), २२(क) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यांबाबत दोषारोपपत्र मा. न्यायालयात पाठविले आहे.

(३)एलएसडी स्टॅम्प या पदार्थास केंद्र शासनाने "औषध"म्हणुन मान्यता दिलेली नाही त्यामुळे प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सेवाग्राम (जिल्हा वर्धा) येथील राष्ट्रपिता महात्मा गांधी एक अनुभूती या विशेष कार्यक्रमला दोन वर्षापासून संवर्धन निधी मिळाला नसल्याबाबत

**(४९) ७१६५१ (२१-०२-२०२४). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सरकारच्या नियोजन विभागाने २९ जून, २०२२ रोजी सेवाग्राम जिल्हा वर्धा विकास आराखडा अंतर्गत राष्ट्रपिता महात्मा गांधी एक अनुभूती या विशेष कार्यक्रमला मंजूरी देऊन तसा शासकीय आदेश काढला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेअंतर्गत विविध विकास कामे, दुरूस्ती व देखभाल करण्यात येणार असून त्याकरिता विशेष बाब म्हणून दरवर्षी जिल्हा वार्षिक योजनेतर्गंत उपलब्ध होणाऱ्या निधी मधून १० कोटी रूपये संवर्धन निधी म्हणून उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला मात्र दोन वर्षाचा कालावधी उलटून सुध्दा अघापही सवंर्धन निधी उपलब्ध करून देण्यात आला नसल्याचे दिनांक ५ ऑक्टोंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी वर्धा जिल्हयाचे तत्कालीन पालकमंत्री यांनी दिनांक ७ फेब्रुवारी, २०२३ व २४ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी वर्धा यांना लेखी निवेदन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्याा अनुषंगाने शासनाने चौकशी करुन राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या सेवागामला (जिल्हा वर्धा) जिल्हा वार्षिक योजनेतर्गंत उपलब्ध होणाऱ्या निधी मधून १० कोटी रूपये संवर्धन निधी म्हणून उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (२०-०३-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, सदर पत्र जिल्हाधिकारी, वर्धा यांना प्राप्त झाले आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सन २०२३-२४ पासून जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत गड-किल्ले, मंदिरे व महत्वाची संरक्षित स्मारके इत्यादींचे संवर्धन या योजनेतून प्राप्त होणाऱ्या निधीतून संवर्धनासाठी खर्च करावा असे जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा यांना निर्देश दिलेले आहेत. दरवर्षी जिल्हा वार्षिक योजनेच्या ३% निधी यासाठी उपलब्ध होणार आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) लागू नाही.

---

## औष्णिक उर्जा प्रकल्पांना वीजनिर्मितीसाठी निर्माण झालेली कोळशाची तूट

**(५०) ७१७१८ (१४-०२-२०२४). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)शासकीय एकूण ७ औष्णिक उर्जा प्रकल्पांमध्ये सध्या ६.६९ लाख टन इतकाच कोळशाचा साठा असून केंद्रीय वीज प्राधिकरणाच्या नियमानुसार पूर्ण क्षमतेने वीज निर्माण करण्यासाठी किमान ७.८० लाख टन कोळशाची गरज असून सध्याच्या कोळसा साठ्यानुसार केवळ मागणीच्या ६० टक्के इतकीच वीज निर्माण होऊ शकेल, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, ही तूट खाजगी कंपन्यांकडून वीज विकत घेऊन भरुन काढलेली असल्यास, त्यापोटी किती रक्कम खर्ची झालेली आहे,

(३) असल्यास, उपरोक्त कोळशाची तूट भरुन काढून मागणीच्या तुलनेत पुरेसा पुरवठा होण्यासाठी व पूर्ण क्षमतेने प्रकल्प सुरु राहण्यासाठी शासन स्तरावर कोणती कार्यवाही वा उपाययोजना करण्यात आली वा येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०३-२०२४) :** (१) हे खरे नाही.

महानिर्मितीने अवगत केल्यानुसार महानिर्मिती कंपनीकडे दिनांक १५.०२.२०२४ रोजी एकूण कोळशाचा साठा २०.१२ लाख मे. टन म्हणजे अंदाजे १४ ते १५ दिवस पुरेल एवढा उपलब्ध आहे.

सध्याच्या विजेच्या मागणीनुसार प्रतिदिन लागणारा कोळसा तसेच पुरेसा उपलब्ध कोळसा पाहता पूर्ण वीज निर्मिती होत आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) महानिर्मितीद्वारे विविध प्रकारे कोळशाचे नियोजन करण्यात येत आहे. यामध्ये कोल इंडिया लिमिटेड (CIL) च्या विविध कंपन्याकडून पुरेसा कोळसा मिळविण्यासाठी पाठपुरावा, संबंधित अधिकाऱ्यांच्या बैठका व भेटी घेण्यात येत आहेत. तसेच रोड कम रेल (RcR), रेल-सी-रेल (RSR), आयात, इत्यादी मार्गाने कोळसा वाहतूक सुरू आहे.

यापुढे कोळश्याच्या कमतरतेमुळे वीज निर्मिती कमी होणार नाही याची काळजी घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री. जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.